# केशवसुतांच्या कवितांचें हस्तलिखित

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
नं. क्र. १६८०
१९६६

लेखक

डॉ. स. गं. मालशे.

मराठी संशोधनमंडळ
ी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई–१४
१९६६

किंमत रु. १=५०

REFBK-0015214

१९ २/७५ १९६० २१/५/६०

# केशवसुतांच्या कवितांचें हस्तलिखित

[ म. सं. पत्रिका, व. १३ अंक ४ आणि व. १४ अं. १ मध्यें प्रसिद्ध ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३९२८९ वि: निबंध
किंमत १-५० नोंद दि: २१/५/६०

लेखक

डॉ. स. गं. मालशे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५२१४
(स्थळ प्रत)

REFBK-0015214

मुंबई मुंबई-१४

१९६६

किंमत रु. १ = ५०

## केशवसुतांच्या हस्ताक्षरांत "तुतारी"

### तुतारी

एक तुतारी द्या मज आणुनि!
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें,
अशी तुतारी द्या मजलागुनि! १

अवकाशाच्या ओसाडीं तिल
पडसाद मुके जे आजवरी,
होतील ते वाचाल सत्वरी
फुंक मारितां जीला जबरी,
कोण तुतारी ती मज देईल? २

सारंगी, ती सतार सुन्दर,
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज, — माझ्या
कसचीं हीं हो पडतिल काजा?
एक तुतारी द्या तर सत्वर! ३

रूढी जुलूम यांचीं दुर्मद
सन्तानें राक्षसी — हंत हा! —
खादाड तुम्हां खातात पहा!
जल्शाचा का समय असे हा?
तुतारिनें या व्हा तर सावध! ४

अवडम्बरलीं ढगें कितीतरि;
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहोर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे;
गाफीलगिरी तरिहि जगावरि! ५

चमत्कार! तें पुराण तेथुनि
सुन्दर सोज्वळ गोडें मोठें,
अलिकडले तें सगळें खोटें;
म्हणती धरुनी ढेरीं पोटें!
थुः त्यांच्यावर! जोडे हाणुनि! ६

जुन्या नभीं या ताजे तारक,
जुन्या भूमिवरि नवी टवटवी,
जुना समुद्रहि नव रत्नें वी;
जुन्यापासुनी निष्पत्ति नवी
काय! नव्हे ती श्रेयस्कारक? ७

जुन्या धरेवर नव तरु सुन्दर,
जुन्या तरूवरि नवी कळी ती,
जुन्या कळ्यांतुनि फळें उपजती,
फळांतूनि त्या नव रस गळती,
कां न म्हणावे मधुर खरोखर? ८

जुनें जाउं द्या मरणालागुन,
जाळुनि किंवा पुरुनी टाका!
सडत न एका ठायीं ठाका,
सावध! ऐका पुढल्या हाका!
खांद्यास चला खांदा ~~घासुन~~ भिडवुनं! ९

उंच अशा बैसुनि तक्तावर
एक वैभवा थोर भोगितो,
धुळीमधें तो अन्य लोळतो
हात न कुत्रा त्याचे खातो!
काय असे ही स्थिती बरोबर? १०

वंदुनियां ह्या देवांलागुनि
धाई धाई मानव रडती!
पायपोस त्यां हाणा सम्प्रति!
देव कशाचे!—अश्रु जे पिती
क्रूरतर न का ते असुरांहुनि? ११

रुधिरा दानव, अश्रूंला सुर
पिती; रक्त हे ~~...~~ देहामधुनी
वाहे, अश्रू पण मेंदूंतुनि,
श्रेष्ठ अश्रु ते शोणितांहुनी;
असुरांहुनि हे देवचि आसुर! १२

!
अ१...... १३

~~स्त्रीवर्गाला स्वदास लेखुनि,~~
~~दाससंतती मानव होतो,~~
~~स्त्रीला अज्ञानांत ठेवतो,~~
~~परिणामी ह्रासास पावतो;~~
~~धिक्कार! अशा चालीलागुनि!~~ १४

पडली छाया मनुजाची जर,
विटाळ होतो तर मनुजाला,
व्हावें स्नानचि सचैल त्याला;
काय म्हणावें या मूर्खाला?—
~~पशूंहुनीहि पशु असती तर~~! १५
नरेंचे केला हीन किती नर!

चमत्कार! तें पुराण तेथुनि
सुन्दर सोज्वळ गोडें मोठें,
अढिकडले तें सगळें खोटें,
म्हणती धरुनी ढेरीं पोटें!
थुः त्यांच्यावर! जोडे हाणुनि! ६
जुन्या नभीं या ताजे तारक,
जुन्या भूमिवरि नवी टवटवी,
जुना समुद्रहि नव रत्नें वी,
जुन्यापासुनी निष्पत्ति नवी
काय! नव्हे ती श्रेयस्कारक? ७
जुन्या धरेवर नव तरु सुन्दर,
जुन्या तरूवरि नवी कळी ती,
जुन्या कळ्यांतुनि फळें उपजती,
फळांतुनि त्या नव रस गळती,
कां न म्हणावे मधुर खरोखर? ८
जुनें जाउं द्या मरणालागुन,
जाळुनि किंवा पुरुनी टाका!
सडत न एका ठायीं ठाका,
सावध! ऐका पुढल्या हाका!
खांद्यास चला खांदा ~~घांसुन~~! भिडवुन! ९
उंच अशा बैसुनि तक्तावर
एक वैभवा थोर भोगितो,
धुळीमधें तो अन्य लोळतो
हात न कुत्रा त्याचे खातो!
काय असे ही स्थिती बरोबर? १०

वंदुनियां ह्या देवांलागुनि
धाई धाई मानव रडती!
पायपोसत्यां हाणा सम्प्रति!
देव कशाचे!—अश्रु जे पिती
क्रूरतर न का ते असुरांहुनि? ११
रुधिरा दानव, अश्रूंला सुर
पिती; रक्त हें ~~...~~ देहामधुनी
वाहे, अश्रू पण मेंदूंतुनि;
श्रेष्ठ अश्रु ते शोणिताहुनी;
असुरांहुनि हे देवचि आसुर! १२

!
अ१...... १३
~~स्त्रीवर्गाला स्वदास ठेवुनि,~~
~~दाससंतती मानव होतो,~~
~~स्त्रीला अज्ञानांत ठेवतो,~~
~~परिणामी दासास पावतो;~~
~~धिक्कार! अशा चालीलागुनि!~~ १४
पडली छाया मनुजाची जर,
विटाळ होतो तर मनुजाला,
व्हावें स्नानचि सचैल त्याला;
काय म्हणावें या मूर्खाला?—
~~पशूंहुनीही पशु नसती तर~~! १५
नरें चे केला हीन किती नर!

हल्ला करण्या ह्या दंभावर—ह्या बंडावर,
धीरांनो! या त्वरा करा रे!
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे!
शूरांनो! तर सरा पुढा रे
तुतारिच्या या सुराबरोबर! १६०
पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुम्बळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती;
देवांच्या मदतीस चला तर! १७

---

— [signature] /m २८-३-८३.

1

स्त्रीवर्गाला दास्यीं दडपुनि,
दासीपुत्रचि मानव होतो,
स्त्रीला अज्ञानांत ठेवितो,
परिणामीं दुर्दशेस जातो;
धिक्कार अशा चालीलागुनि! ~~१~~ १२
पत्नीनिधनीं अन्य वरी नर,
परि पति मरतां स्त्रीचा, तीतें
बळेंचि देतो संन्यासातें
विसंगति हें-जनिसाफल्यातें
अवश्य आहे संसृति भूवर. १४ अ

श्री. १५२९१४ ८१२८४ ९६०० १०७५ २५१२६

# केशवसुतांच्या कवितांचें हस्तलिखित

लें०—स. गं. मालशे

कै. केशवसुतांच्या कवितांचें प्रस्तुत हस्तलिखित केशवसुतांच्या वंशजांकडून कै. प्रा. रा. कृ. लागू यांजकडे आलेलें होतें, तें त्यांच्याकडून मराठी संशोधन मंडळाचे डायरेक्टर प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं संशोधनमंडळाच्या हस्तलिखित–संग्रहासाठीं मिळविलें.

हें हस्तलिखित आतां चोपडीच्या स्वरूपांत नाहीं. उभे सुटे सुटे चवरखे आहेत. प्रत्येक चवरख्याला दढत्व येण्यासाठीं पाठीमागें आणखी एक चवरखा डकविलेला आहे. (कांहीं थोड्या कविता बंदांवर लिहिलेल्या आहेत, त्या मूळ वहींतल्या नसाव्या). हे चवरखे पूर्वी एकत्र शिवलेले असावे; कारण सुईनें पाडलेल्या पण आतां बुजालेल्या छिद्रांच्या खुणा चवरख्याच्या उजव्या कडेला आहेत. हे सर्व कागद एका काळ्या मजबूत पुठ्याच्या मलपृष्ठांत बांधलेले असावे. ह्या मलपृष्ठांतच हे सुटे चवरखे ठेवलेले आहेत. कागदाला कागद डकविण्याचें कार्य प्रत्यक्ष कवीनें केलेलें किंवा कवीच्या नजरेखालींच झालेलें असलें पाहिजे; कारण अशा डकविलेल्या चवरख्यांच्या पाठीवरहि कवीच्या हस्तक्षरांतील कविता क्वचित् आढळून येतात. चवरखे ६॥। × ८॥ इंची आहेत.

'मुळामुठेच्या तीरावर', 'रांगोळी घालतांना पाहून', 'आगबोटीच्या कांठाशीं....', आणि 'म्हातारी' कवितेची एक प्रत, बंदाच्या आकाराच्या कागदांवर लिहिलेली आहे. अपूर्ण कविता वेगळया कागदावर पेन्सिलीनें लिहिलेली, टांचणवजा आहे. पहिल्या सात आठ कविता जांभळया शाईनें लिहिलेल्या आहेत. बाकी शिऱ्याची दाट वा फिक्की शाई उपयोजिलेली आहे. किरातार्जुनीय–सर्ग १ ला, या कवितेच्या तिसऱ्या चवरख्याच्या पाठीवर 'नरपतिहितकर्ता' या श्लोकाचें भाषांतर लिहिलेलें आहे. 'तत्त्वतः बघतां नामावेगळा' व 'तहानभूक आरंभीं नव्हती' या कविता अनुक्रमें 'समृद्धि आणि प्रीति' व 'पद्यपंक्ति' या कवितांच्या पाठींवर पेन्सिलीनें लिहिलेल्या असून 'तुझें नाम मुखीं' ही शेवटची कविता 'हरपलें श्रेय' या कवितेच्या शेवटच्या पानाच्या पाठीवर पेन्सिलीनें लिहिलेली आहे. स्फुट श्लोकांपैकीं ८ श्लोकांवर काट मारलेला आहे.

'सतारीचे बोल' या कवितेच्या ८ व्या कडव्यांतील 'वदती रव ते–दिड दा, दिड दा' या चरणापूर्वी समासांत sudden transition or rise असें पेन्सिलीनें लिहिलेलें आहे; तर 'दुर्मुखलेला' या कवितेच्या समासांत worth printing असा निळया पेन्सिलीनें शेरा मारलेला आहे. 'श्लोका'सारखें वृत्तनाम कधींकधीं

मागाहून तांबड्या पेन्सिलीनें लिहिलेलें दिसून येतें. 'राजा शांतनु' या कवितेवर शीर्षक नाहीं पण 'श्री' कार आहे. आगबोटीच्या कांठाशीं......ही कविता अपूर्ण राहिलेली असावी कारण हस्तलिखितांत मुद्रित झालेला भाग संपल्यावर 'अंक दुसरा' असें प्रथम लिहून, मग तें खोडून 'तरंग दुसरा' असे शब्द लिहिलेले आढळतात, पुढें कविता मात्र उतरलेल्या नाहींत. या कवितेंतील २२ चे ३ च चरण आहेत व २३ ते २६ नाहींत. अनुनासिकांचें लेखन परसवर्णी करण्याकडे कवीचा कल आहे. मुद्रित प्रतींच्या संपादकांनीं हें ध्यानांत घेऊन मुद्रण केलेलें आहे. हस्तलिखितांत कित्येक कवितांतील श्लोकांचे क्रमांक आधीं म्हणजे समासाच्या लगत घातलेले आढळून येतात.

एकंदरींत हें हस्तलिखित अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेलें दिसतें. मूळ टांचणावरून बहुसंख्य कविता सुवाच्य लिहून काढलेल्या दिसतात. तृतीयेच्या 'मीं' वरील अनुस्वारहि राहिलेले नाहींत (पहा :—**मीं** पाहिली एक सुरम्य बाला–माझा अन्त). 'सतारीचे बोल' या कवितेंतील कडवीं मागेंपुढें झालीं होतीं. चवथें कडवें आधीं पडलें होतें आणि तिसरें नंतर पडलें होतें. तेव्हा कडव्यांच्या अंतींचे क्रमांक ४ आणि ३ असे दुरुस्त करून ठेविलेले आहेत. म्हणजे मूळ रफ् अशा टांचणांवरून ही सुवाच्य प्रत बनविलेली आहे हें उघड आहे. ही सुवाच्य प्रत आहे, याचें आणखी एक गमक देतां येईल. 'माझें चित्र ठेवुनि घे' या कवितेवरील टीप हस्तलिखितांत नाहीं; पण ती लिहिण्यासाठीं जागा मोकळी सोडलेली आहे. 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' या टीपेंतील 'आत्माराम आणि आक्का कोण हें सांगावयास नकोच' हें शेवटचें वाक्य हस्तलिखितांतील एका प्रतींत नाहीं; दुसरींत तें आहे. 'रूढि–सृष्टि आणि कवि' या कवितेच्या प्रारंभींची टीप हस्तलिखितांत नाहीं.

हस्तलिखितांत केशवसुतांच्या एकूण १३२ कवितांपैकीं १०२ कविताच आहेत. कांहीं कवितांच्या दोन प्रती आहेत. नैऋत्येकडील वारा, वातचक्र, गोफण केली छान, दंत्राचें यंत्र या चिरपरिचित कविता हस्तलिखितांत नाहींत. 'जरी तूं ह्या येथें असतिस.' या कवितेच्या दुसऱ्या चवरख्यामागें दडतेसाठीं जो कागद डकविला गेला आहे, त्यांत केशवसुतांची 'कृष्णाजी केशव दामले' अशी लपेटदार मोडी सही गेली आहे. कागद प्रकाशाविरुद्ध धरून पाहिल्यास ती सुस्पष्टपणें दिसते. मूळ वहींतलीं शेवटचीं दोन पानें अद्यापि तृतीय मलपृष्ठाला चिकटून आहेत. त्यांपैकीं पहिल्यावर बाळंतिणीस लागणाऱ्या वस्तूंची यादी आहे तर दुसऱ्या म्हणजे वहीच्या शेवटच्या पृष्ठावर एकाखालीं एक असे पेन्सिलीनें लिहिलेले पुढील शब्द आहेत :—कोकिल, देवदर्शन, चंद्रभाट, कयमाष, अज्ञानांतील ध्वनी, कुरकुर, पुण्यदर्शन, घुबड. हें संकल्पित कवितांचें, किंवा रचलेल्या पण आतां अनुपलब्ध असलेल्या कवितांचें, टांचण असावें, असें वाटतें. ('घुबड' अर्थातच उपलब्ध

कवितांत मोडेल.) भृंग, प्रीति, झपूर्झा (अपूर्ण) अशा तीन कविता एका संपूर्ण पानावर पेन्सिलीनें लिहिलेल्या आहेत. हें घडी घातलेलें पान (दोन बंद) या बाडांत आहे.

'समग्र केशवसुत 'मध्यें या हस्तलिखितासंबंधीं प्रा. पंडित म्हणतात, "पाठांतराच्या दृष्टीनें या बाडाचा फारसा उपयोग नाहीं." पण हस्तलिखिताशीं मुद्रित प्रतींची बारकाईनें तुलना करून पाहिल्यास हें मत बरोबर नाहीं, हें दिसून येईल.

या लेखांत ह प्रतीशीं (हस्तलिखिताशीं) पुढील तीन मुद्रित प्रतींची तुलना करून पाहावयाची आहे :—

(१) **केशवसुत यांची कविता**, संग्रा. हरि नारायण आपटे, प. आ. पुणें १९१७ (आ प्रत).

(२) **केशवसुतांची कविता**, संपा. प. चिं. दामले, पांचवी आ., पुणें १९४९. (दा प्रत).

(३) **समग्र केशवसुत**, संग्रा.–भ. श्री. पंडित, पुणें १९६४ (पं प्रत).

## मुद्रित न झालेल्या मराठी कविता

या बाडांतील अप्रसिद्ध असलेल्या कवितांसंबंधीं प्रा. पंडित म्हणतात, "एक कविता साधारण दीर्घ असून दुसरीं दोन दोन ओळींचीं दोन स्फुटें आहेत. या तिन्ही कविता उत्तान शृंगारिक असल्यामुळें हरिभाऊ आपट्यांनीं व सीतारामपंत दामल्यांनीं आपापल्या आवृत्तींत त्यांचा समावेश केला नसावा. मींदेखील या ग्रंथांत त्यांचा समावेश केला नाहीं." (पृ० १२).

पंडित म्हणतात ती साधारण दीर्घ कविता म्हणजे ७ श्लोकी कविता आहे. अप्रसिद्ध स्फुटें दोन नसून तीन आहेत आणि तीं दोन ओळींचीं नसून चार ओळींचीं (चरणांचीं) आहेत. 'स्फुट' या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेल्या श्लोकांपैकीं हे श्लोक पूर्वींच्या संपादकांनीं वगळले. ऐतिहासिक दृष्ट्या ते प्रसिद्ध होणें अवश्य आहे, हें वेगळें सांगावयास नको.

(अ) हस्तलिखितांत शीर्षक नसलेल्या कवितांपैकीं ही अप्रसिद्ध कविता आहे :—

**बायांनीं धरुनी बळें प्रथम जी खोलीमधें घातली;**
**लज्जाव्याकुल होउनी रडत जी कोनीं उभी राहिली,**
**तीचे अश्रु अळेंबळें पुसुनियां, कोणी प्रयत्नें तिला**
**घेऊनी कडिये असेल शयनीं नेण्यास तो लागला ! १**

'ये आतां जवळी!' म्हणोनि चुटकी देतो बरें हा कधीं,
ऐशी उत्सुक होउनी, पदर तो घेऊनि ओठामधीं,
शय्येसन्निध नाथ पाहत उगी लाजेमुळें बैसली,
कोणाचीं असतील लोलनयनें तीचेवरी लोभलीं! २

पानांच्या तबकांतुनी जवळच्या, ताम्बूल जो दीधला
कान्तेनें स्वकरें मुखांत दुरुनी, चावूनि तो चांगला,
त्याचा भाग तिच्या मुखांत अपुल्या जिव्हेमुळें द्यावया,
कोणी घेत असेल पुष्टजघनी अंकावरी ती प्रिया! ३

लज्जा सोडुनि जी परन्तु विनयें अंकावरी बैसली,
हातांची रचिली तिनें पतिचिया कण्ठास हारावली,
तीचे उच्च कुचद्वया अपुलिया वक्षावरी दावुनी,
कोणी पीत असेल ऐहिक सुधा वेगें तिला चुम्बुनी! ४

केव्हां दन्त मुखावरी, स्तनतटीं केव्हां नखें रोवुनी,
गाढालिंगन देउनी, निजकरें श्रोणी जरा तिम्बुनी,
केव्हां अंगुलि त्या हळू फिरवुनी अंकीं स्वकान्तेचिया,
कोणी यत्न असेल तो करित ती कामोद्धता व्हावया! ५

सान्निध्यांत पडो जराहि नच तें कान्तेचिया अन्तर,
यासाठीं कचपाश सुंदर तिचा सोडूनियां सत्वर,
झाले केश सुरेख दीर्घ मग ते काळे तिचे मोकळे,
त्यांहीं घेत असेल कामुक कुणी बांधूनि दोन्ही गळे! ६

कामानें जळतों परन्तु विरहें होउनि मी विव्हळ;
आहेना तुजला असाच सखये! जाळीत हा गे खळ?
कैशी होशिल शक्त या रजनिला कंठावया सम्प्रति!
माझीही छळणूक तो करितसे कंटाळवाणी अति! ७

पुणें, १८८७

( आ ) 'स्फुट' या शीर्षकाखालीं केशवसुतांचे १३ श्लोक मुद्रित प्रतींमधून आढळतात. हस्तलिखितांत ते १६ आहेत. तीन श्लोक बहुधा त्यांतल्या अश्लीलतेमुळें मुद्रित केलेले नसावे. ते श्लोक असे :—

(१) 'हें गे सुन्दरि पत्नि ! काय पदरीं तूं आणिलें झांकुनी ?'
'कोठें काय ?' म्हणूनि ती वदतसे वक्षाकडे लक्षुनी
'हीं हीं दोन फळें !' म्हणूनि पदरा पाडूनि आलिंगुनी,
वक्षोजां कवळोनि तो पुसतसे 'आलें गडे का मनीं ?'

(२) रात्रीं ते सुरतप्रबन्ध सुचुनी अभ्यासकालीं बरे,
लागा पुस्तक हो तुम्ही वरिवरी चाळावयाला करें,
तों होवोनि जिन्यांत छुमछुम् असा आवाज त्याच्या भयें
हस्तांतूनि सवेंचि पुस्तक गळो मेजावरी तें स्वयें !

(३) पांथोक्ति–प्रत्युक्ति

"कोणाची गे वनश्री नयनसुखद ही ?" "मत्पतीची असे हे."
"कां ऐशी शुष्क शोभाविरहित ?" "अपरासक्त तो फार आहे."
"त्यक्ता तापें जरी ही कृश परि रिझवी चित्त माझें स्वभावें."
"ऐसें हो का जरि, त्वां तरि रसिकवरा ! स्वस्थ चित्तें रमावें !"

(इ) 'कांहीं स्वकृत वचनें' या कवितेच्या चवरख्याच्या पाठीवर हे हिंदी चुटके लिहिलेले आहेत :—

(१) सूर सूर तुलसी ससी उडुगण केसव ओर
अबके कविखद्योत भये चमकत ठोरहि ठोर

(२) पग धरत चिन्ता करत तेकन साहे शोर
सुवर्णकू धूंडत फिरे कवि व्यभिचारी चोर

दुसऱ्या हिंदी दोहऱ्यांतील तेकन आणि शोर हे शब्द अधोरेखित करून त्यांचे अर्थ बाजूला अनुक्रमें 'थोडा' आणि 'गलबला' असे लिहिलेले आहेत.

—हे चुटके बहुधा कवीला भाषांतरित करावयाचे असावे.

## वृत्तविषयक प्रश्न

मुद्रित प्रतींमधून आढळणारीं इंद्रवंशा, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, साकी इ० वृत्तनामें हमध्यें प्रायः दिलेलीं नाहींत. याला जे थोडे अपवाद आहेत, ते असे :—

(१) **प्रीति** :—या कवितेवर 'गाणें' असा उल्लेख आहे, तो मुद्रित प्रतींमध्यें नाहीं.

( २ ) **फुलांची पखरण** :—या कवितेचें शीर्षक ' गाणें–फुलांची पखरण ' असें आहे. **आ** आणि **दा** या मुद्रित प्रतींतून ' गाणें ' शब्द गाळला आहे. **पं**प्रतींत तो चालीच्या ठिकाणीं दिला आहे.

( ३ ) **मूर्तिभंजन** :—मुद्रित प्रतींप्रमाणें ह प्रतीमध्येंहि ' अभंग ' असा उल्लेख आहे.

( ४ ) **फार दिवसांनीं भेट** :—या कवितेवर ' इस तन धनकी कोन बढाई ' ही चाल मुद्रित प्रतींप्रमाणेंच **ह** मध्येंहि आहे.

( ५ ) **संध्याकाळ** :—**ह** प्रतींत ' श्लोक ' असें तांबड्या पेन्सिलीनें लिहिलेलें आहे. **आ**प्रतींत तसाच उल्लेख आहे. **दा** आणि **पं** प्रतींमध्यें ' शार्दूलविक्रीडित ' हें वृत्तनाम दिलेलें आहे.

( ६ ) **मुळामुठेच्या तीरावर** :—या कवितेची चाल **ह**मध्यें " हरिची भगिनी म्हणे सुभद्रा' किंवा "पंचतुण्ड नररुण्ड–" अशी आधीं लिहिलेली होती. नंतर ' पंचतुण्ड नररुण्ड–' हे शब्द पेन्सिलीनें खोडले आहेत.

( ७ ) **दूर कोठें एकला०** :—**ह** प्रतींत ' दिंड्या ' तर मुद्रित प्रतींतून ' दिंडी ' असें वृत्तनाम दिलेलें आहे.

( ८ ) **हरपलें श्रेय** :—या कवितेच्या खालीं **ह** प्रतींत ' गाणें ' अशी टीप आहे. मुद्रित प्रतींत ती नाहीं.

मात्रावृत्तात्मक किंवा पदांच्या चालींवर रचिलेल्या कांहीं कवितांच्या कडव्यांचे मुद्रित प्रतींतून आढळून येणारे क्रमांक आणि **ह**प्रतींतील क्रमांक यांत फेर पडतो. पुष्कळदां **आ**प्रत **ह** प्रतीशीं जुळते. **दा**प्रतींत कडव्यांचे क्रमांक न देण्याकडे कल आहे. **पं**प्रतींत चुकीच्या स्थलीं कडवीं पाडलेलीं दिसून येतात, उदा :—

( १ ) **मरणकाल** :—**ह** प्रतींत दोन दोन चरणांची एक कविता याप्रमाणें एकूण आठ कविता आढळतात. **आ** प्रतींत हेच क्रमांक आहेत. **दा** मध्यें क्रमांकच दिलेले नाहींत. **पं**प्रतींत चार आंकडे दिलेले आहेत. या कवितेचें वृत्त कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या मेघदूतासारखी तोटकी द्विचरणी साकी आहे हें ध्यानांत घेतलें, तर **ह** आणि **आ** मधील आठ कवितांची विभागणी योग्य ठरते.

( २ ) **रुग्ण सुन्दरीस** :—**ह**प्रतींत चार कडवीं आहेत. **आ** मध्यें तशींच चार आहेत. **दा**मध्यें क्रमांकच नाहींत. **पं** मध्यें दोन आहेत. पुस्तक रूपानें येण्यापूर्वीं ही कविता दोनदां मासिकांतून प्रसिद्ध झालेली होती. [ **मासिक मनोरंजन**, पु. ३ अंक २ आणि **काव्यरत्नावली** व. १२ ( जून १९०० ) ]. या दोन्ही स्थळीं या

कवितेचीं कडवीं चारच आहेत. ‘ वीरा भ्रमरा ’ ही चाल, आशयाची खंडशः होणारी विभागणी आणि ‘ री ’ या अक्षराची यमकापेक्षा या गोष्टी ध्यानांत घेतल्यास ह आणि आप्रतींतील चार कडवींच युक्त ठरतील. आप्रतींत ‘ चाल लावणीची ’ असा उल्लेख आहे.

( ३ ) **फार दिवसांनीं भेट** :—‘ इस तनधनकी कोन बढाई ’ या पदाच्या चालीवरची ही कविता आहे. ह मध्यें दहा दहा चरणांचें एक अशीं तीन कडवीं आहेत. आप्रतींत अशीच विभागणी आहे. दाप्रतींत कडव्यांचे क्रमांक नाहींत. मुद्रण मात्र आठ कडवीं असल्याप्रमाणें केलेलें आहे. पं प्रतींत या कवितेचें मुद्रण दाप्रती-प्रमाणेंच करून आठ क्रमांक दिलेले आहेत. ही कविता संग्रहीत होण्यापूर्वी काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालेली होती. [ सप्टेंबर १८९८]. तेथें हप्रमाणेंच तिचीं कडवींच आहेत. या कवितेंत ‘बहुतां दिवशीं भेट जाहली’ हा दहावा चरण दोनदां आणि त्याच आशयाचा ‘जधीं बहु दिनीं भेट जाहली ’ हा दहावा चरण शेवटीं एकदा येतो. आशयाचें अवसान याच चरणांवर होतें. ध्रुवपदांतील पालुपदासारखा घोळविण्याचा दुसरा चरण ‘ प्रणयसिंधुला भरती आली ’ हा आहे. एकंदरींत यमकापेक्षा ‘ ली ’ अक्षराची आहे. हें सर्व जमेस धरलें कीं दा आणि पं प्रतींतील विभागणींत कसलाच ताळमेळ नाहीं, हें स्पष्ट होतें. या प्रतींतून कधीं ‘ होऊनी ’, कधीं ‘ लागला ’ तर कधीं ‘ परस्परांचे ’ यांसारख्या यमकभंगी शब्दांनीं कडव्यांचे शेवट होतात. ‘ इस तन धनकी कोन बढाई ’ या रूढ लोकप्रिय पदाची चाल स्वीकारल्यावर यमकबंधन झुगारण्याचें अनौचित्य केशवसुत दाखवितील, असें वाटत नाहीं. दा प्रत आणि पं प्रत यांच्या विभागणीमुळें आणखीहि आपत्ति ओढवते. त्या प्रतींतून पहिलीं सात कडवीं चार चरणी आणि शेवटचें कडवें द्विचरणी अशी विषम विभागणी स्वीकारावी लागते. तेव्हां ह आणि आ यांतील विभागणीच युक्त.

( ४ ) **घुबड** :—ह आणि आ प्रतींत या कवितेचीं एकूण आठ कडवीं दिलेलीं आहेत. दा प्रतींत कडव्यांचे क्रमांकच नाहींत. पंप्रतींत कडव्यांची संख्या दुप्पट म्हणजे सोळा आहे. ही कविता संग्रहीत होण्यापूर्वी मासिक मनोरंजनांत प्रसिद्ध झालेली होती [ पु.० ७, अं. १०, एप्रिल १९०२ ]. तेथें पहिल्या कडव्याचा आंकडा दिलेला नाहीं. पण दुसऱ्या कडव्याच्या प्रारंभीं मधोमध [ २ ] असा क्रमांक दिलेला आहे. असे सर्व कडव्यांचे आठ आंकडे होतात. पं प्रतींत केवळ ‘ र ’ या अक्षराची यमकापेक्षा गृहीत धरून विभागणी केलेली दिसते. वास्तविक प्रथम तीन आंखूड चरणांचा अंतरा, नंतर एक लांब चरण, पुन्हा दोन आंखूड चरणांचा अंतरा आणि नंतर एक लांब चरण असें एकेक कडवें सप्तचरणी आहे. प्रमाणबद्धतेच्या दृष्टीनें हीच विभागणी योग्य ठरेल. केशवसुतांनीं ही कविता एडगर एलन पोच्या ‘ दि रेव्हन ’ वरून रचिलेली आहे. त्या कवितेंत रेव्हन पक्ष्याच्या ‘ नेव्हर मोअर ’ या उद्गारांनीं

पुष्कळशीं कडवीं संपतात. कांहींचा 'नथिंग मोअर' या शब्दानें शेवट होतो. 'घुबड' ही कविता 'दि रेव्हन'च्या मानानें छोटेखानी असली, तरी रेव्हन आणि घुबड यांच्या पताकास्थानाप्रमाणें येणाऱ्या अशुभ उद्गारांनींच दोन्ही कवितांत आशयाचें अवसान होतें, हें साम्य नजरेआड करण्याजोगें नाहीं. 'वर्णी करूनी घूत्कार', 'घू घू करुनी घूत्कार', 'त्यानें करूनी घूत्कार' असे 'घूत्कार' या शब्दानें अंत होणारे चरणच प्रत्येक कडव्याचे शेवटीं येतात. प्रा. रा. श्री. जोग यांनीं आपल्या 'केशवसुत' या ग्रंथांत या कवितेचीं कडवीं आठच मानलीं आहेत (पृ. २००). तेव्हां या कवितेतील कडव्यांची विभागणी ह आणि आ प्रतीप्रमाणेंच युक्त ठरते.

**जगामर्धीं या तुला** :—या कवितेंत 'घाम उन्हाचा फार येईल बा तुला', 'स्फटिक ते धवल...', 'मग काय सांगणें ?...' हे जे तीन कडव्यांच्या अंतऱ्यांचे पहिले चरण, त्यांच्या पूर्वीं ॥ चाल ॥ असा चाल बदलल्याचा निदर्शक शब्द ह प्रतींत आहे; तो मुद्रित प्रतींतून नाहीं.

**वियुक्ताचा उद्गार** :—ह मध्यें या कवितेच्या तीन प्रती आहेत. प्रतींत चरणांचे आंकडे नाहींत. पैकीं एकीच्या लेखनाकडे बारकाईनें पाहिल्यास तींत अष्टक आणि षट्क अशी विभागणी आढळून येते. दुसऱ्या प्रतींत आणि **दा** प्रतींत ४ + ४ + ४ + २ अशी विभागणी आहे. आप्रतींतील या कवितेच्या एका पाठांत ओळीनें सरळ चौदा चरण मुद्रित केलेले आहेत. तर एका पाठांत ५ + २ + ५ + २ अशी विभागणी आहे. ही कविता संग्रहीत होण्यापूर्वीं मासिक मनोरंजनांत आलेली होती (पु. ९ अं. २, ऑगस्ट १९०३). तेथें **दा** प्रमाणें ४ + ४ + ४ + २ असें मुद्रण आहे. हमधील एका प्रतींत या कवितेची अष्टक आणि षट्क ही मिल्टनी पद्धतीची विभागणी, लेखनाच्या तऱ्हेनें दर्शित होते, हें वैशिष्ट्यपूर्ण म्हटलें पाहिजे. 'मयूरासन आणि ताजमहाल' या कवितेचेंहि ह मधील लेखन ती कविता मिल्टनी सुनीत आहे, हें दर्शविणारें अष्टक आणि षट्क पद्धतीचें आहे.

**निशाणाची प्रशंसा** :—ही कविता ह प्रतींत पुढीलप्रमाणें चरणक पाडून लिहिलेली आहे :—

**तुज जरि करिती काठीला**
**लावुनियां पटखंड**
**तरि तुजमध्यें वसत असे**
**सामर्थ्य बा उद्दंड ॥ १ ॥**

परंतु तीनहि मुद्रित प्रतींत चरणक न पाडतां दोन दोन ओळींतच एकेक कडवें संपविलेलें आहे. ही कविता संग्रहीत होण्यापूर्वीं नियतकालिकांतून दोनदां प्रसिद्ध झालेली

होती [ **सुविचारसमागम**, पु. २, अं. १२ ( एप्रिल १९०० ) आणि **करमणूक** २१-१-९९ ]. या दोन्ही स्थलीं या कवितेचे चरण पाडलेले नाहींत.

**कांहीं स्वकृत वचनें** : यांतील दोन क्रमांकाचें वचन ' अभंग ' आहे. हप्रतींत त्यांचें लेखन

**उद्योगांत वेळ । ज्याचा नित्य जाई**
**त्याला देव होई । अनुकूल**

असें सदंड आहे. मुद्रित प्रतींतून दंड नाहींत.

## परिष्करण

या हस्तलिखितांतील बहुसंख्य कविता मुद्रणप्रत तयार करावी, तशा सुवाच्य लिहिलेल्या आहेत. त्यांच्या लेखनांत विरामचिह्नादिकांविषयींहि कांटेकोर दक्षता घेतलेली आहे. सुधारणा किंवा परिष्करण असें थोड्याच कवितांत दिसून येतें. पुष्कळशा सुधारणा पेन्सिलीच्या आहेत. कांहीं काळ्या शाईच्या तर कांहीं जांभळ्या शाईच्याहि आहेत. शब्दा-दोन शब्दांची दुरुस्ती असल्यास काट मारून, काकपद देऊन, तिथल्या तिथेंच डोक्यावर केलेली असते. कधीं कधीं दुरुस्त शब्द समासांतहि लिहिलेला असतो. कधीं कधीं सुधारणीय शब्दावर काट न मारतां तो अधोरेखित केलेला दिसतो. जेव्हां चरणच्या चरण परिष्कृत झालेला असतो, तेव्हां चरणापूर्वीं अधिक चिन्हासारखी खूण करण्यांत येऊन दुरुस्त चरण खालीं तळटीपेप्रमाणें लिहिलेला असतो.

कवीनें प्रथम लिहिलेला पाठ ( प० ) आणि सुधारलेला पाठ ( दु० ) यांची परस्पर तुलना करून पाहिल्यास ती कविमनाच्या प्रवासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीनें खचित् उद्बोधक ठरण्याजोगी आहे. येथें कांहीं ठळक परिष्करणांचा विचार करूं :

### खिडकीकडे मौज पहावयास

**( १ ) प०—कोणी गवाक्षीं सहसा निघाली,**
**दु०—जाळीकडे एक जवें निघाली,**

—दुसरा पाठ अधिक सुलभ आणि सफाईदार आहे. ' गवाक्षीं 'पेक्षां ' जाळीकडे ' हा अगदीं मराठमोळा शब्द शिवाय ' सहसा ' यांत आशय थबकल्याचा जो ध्वनि निर्माण होत होता, तो ' जवें ' हा शब्द वापरल्यामुळें राहिलेला नाहीं. दुरुस्त चरण अधिक गतिमान आहे.

**( २ ) प०—एकांत जों अञ्जन लोचनांला—**
**घालूनी वञ्ची दुसरा तयाला**

दु०—एकांत जो अञ्जन लोचनांत—
घालूनि घालूं म्हणते दुज्यांत,

—'वञ्जी' हा कर्णकटु शब्द गेला; तरी एकंदरींत दुरुस्तपाठहि गद्यप्रायच राहिलेला आहे.

(३) प०—काञ्ची तिची पूर्ण न गुम्फिली ही
दु०—ती ओविली जी पुरती न मेखला

—दोहोंत सरसनिरस ठरविणें कठिण आहे!

(४) प०—विलोल नेत्रभ्रमराकुलांनीं
त्यांच्या अहो! आसववासितांनीं
वातायनें व्यापियलीं मुखांनीं
शृंगारिलीं काय सरोरुहांनीं!

दु०—लोलाक्ष ते भ्रमर ज्यांवरि शोभतात,
आहेहि आसवसुवास भरून ज्यांत,
त्या त्यांचिया सुवदनीं खिडक्या भरूनी
गेल्या—जणूं सजविल्याच सरोरुहांनीं!

—या परिष्करणाचीं दोन वैशिष्ट्यें आहेत. एक म्हणजे येथें सबंध श्लोकच्या श्लोक परिष्कृत झालेले आहेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे परिष्करणामुळें सुयोग्य वृत्तपालटहि झालेला आहे. या कवितेचे पहिले पांच श्लोक उपजाति वृत्तांतील, सहावा श्लोक एकेक अक्षराची भर घातलेला इंद्रवंशेमधील आणि सातवा श्लोक वसंततिलका वृत्तांतील आहे. **आ, दा** किंवा **पं**प्रतींच्या संपादकांनीं याची नोंद केलेली नाहीं. पहिल्या सहा श्लोकांत स्त्रियांच्या प्रत्यक्ष कृतींचें वर्णन आलेलें आहे आणि शेवटच्या श्लोकांत कल्पक उत्प्रेक्षेनें संपूर्ण दृश्याला गवसणी घातल्यागत केलें आहे. 'लोलाक्ष ते भ्रमर' हे शब्द श्लोकाच्या मुखींच आल्यानें रसिक वाचकाला कल्पनेच्या पातळीवर झटक्यांत नेलें जातें. पहिली अभिव्यक्ति संस्कृतप्रचुर होती; त्या मानानें दुसरी मराठमोळा म्हणावी लागेल. 'वातायनें' ऐवजीं 'खिडक्या' हा सहज अर्थबोध होणारा शब्द आला. 'अहो' हें पादपूर्णार्थक ठरण्याजोगें संबोधन दुरुस्त पाठांत टाळण्यांत आलें आहे.

## उगवत असलेल्या सूर्यास

प०—कवळुनी करजालें भूमिकण्ठास, लाल
दु०—कवळुनि करजालें भूमिलागूनि, लाल

९८०

—'भूमिकण्ठास करजालें कवळुनि' हें स्पर्शचित्र खरोखर विचित्रच निघणार! तेव्हां कवीनें 'भूमिलागूनि' असें साधें व्यक्तीकरण केलें असावें.

## सृष्टि आणि कवि

**प०—निळोबा, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर**

**दु०—वयस्या, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर**

—'निळोबा' हा शब्द पेन्सिलीनें खोडून कवीनें नंतर त्याचें सामान्यीकरण 'वयस्या' असें केलें. पण यावरून कवीचा कोणी 'निळोबा' नांवाचा 'वयस्य असावा, असा तर्क करावासा वाटतो.

## नाहीं ज्या परी डोंगळा

**प०—नाहीं ज्या परि डोंगळा कधिंहि तो गेला कडे साखरे,**

**दु०—नाहीं ज्यापरि डोंगळा कधिंहि तो गेला झणीं साखरे,**

—'कडे साखरे' यांतील दुष्क्रमत्वाचा दोष दु. पाठानें टळला. 'झणीं' हा गतिदर्शक शब्द आला हेंहि युक्तच.

## किरातार्जुनीय—सर्ग १ ला

**प०—पात्रापात्र विचार पाहुनि, सदा पात्रीं अशा तो नरीं**

**दु०—योग्यायोग्य विचार पाहुनि सदा पात्रीं अशा तो नरीं**

—दोन्ही पाठांत सरसनिरस ठरविणें कठिण. 'पात्र' या शब्दांतून कधीं कधीं विपरीतार्थ सुचविला जातो, म्हणून त्याची पुनरुक्ति टाळण्याचा बहुधा कवीचा हेतु असावा.

## आगबोटीच्या कांठाशीं....

**प०—तसा माझ्या वक्षीं कर तव सखे! सुन्दर अहा!**

**दु०—तसा माझ्या कण्ठीं कर तव सखे! सुन्दर अहा!**

—येथें रेखाटलेल्या कल्पनाचित्रांत 'कण्ठीं' या पाठानें अधिक रेखीवपणा आलेला आहे.

## संध्याकाळ

**प०—ध्याती ते निज माधुकांस, गमतें, उल्हासुनी अन्तरीं;**

**दु०—ध्याती ते निज सुन्दरींस, गमतें उल्हासुनी अन्तरीं;**

—'माधुकांस' या आधुकमाधुकी ग्राम्यतेचा वास असलेल्या शब्दापेक्षां आशयाशीं साजून असणारा 'सुन्दरींस' हा शब्द अधिक युक्त म्हटला पाहिजे.

## थकलेल्या भटकणाराचें गाणें

प०—गुंगीमध्यें तुज भेटाया कितिक मारिल्या भरारिया !
व्यर्थ जाहले श्रम ते सगळे ! येति जिण्याच्या शिसारिया !

दु०—कितिक योजिले यत्न यावया तुजशीं मी उत्सुकतेनें !
व्यर्थ जाहले अवघे ! दुर्धर कसें न व्हावें मग जगणें ?

—भरारिया, शिसारिया यांसारखे स्वरागम झालेले शब्द प्राचीन कवितेंत वा स्त्रीगीतांत शोभून दिसतात ( पहाः—पायीं घागरिया । वांक्या साजिरिया इ. ). पण आधुनिक कवितेंत 'भरारिया' 'शिसारिया' असे शब्द आले कीं त्या शब्दांच्या नादानें हास्यास्पद लहर मात्र उठून जाते. शैलीची समता आणि आशयाचें गांभीर्य राखण्याच्या दृष्टीनें नव्यानें मांडणी करून कवीनें दुरुस्त केलेला पाठ युक्त म्हणावा लागतो.

## मजुरावर उपासमारीची पाळी

प०—कां मारिसी आज भुकेमुळें तर ?

दु०—कां मारिसी हाय ! भुकेमुळें तर ?

—'हाय !' शब्दानें करुण उद्गारांचा चटका अधिक जाणवतो. 'आज' शब्द गेल्यानें अर्थहानीहि फारशी झालेली नाहीं.

## फुलांची पखरण

प०—आशेच्या वेलीवरी गाणीं गे फुललीं;

दु०—आशेचिया ग वेलीवरतीं गाणीं तीं फुललीं;

—पारंपरिक स्त्रीगीताची लय या गाण्याला आहे. 'आशेच्या' ऐवजीं 'आशेचिया' हा स्वरागम वेगळा गोडवा आणून देणारा आहे. स्त्रीगीताच्या लयीला पोषक आहे.

## भृंग

प०—श्रुतिविचित्रता बघणारे
दु०—श्रुतिवैचित्र्या बघणारे

—प. मध्यें 'श्रुतिविचित्रते' असें तरी हवें होतें; पण एकंदरींत दुसरा परिचित शब्दानें युक्त असा पाठ बरा वाटतो.

## मयूरासन आणि ताजमहाल

(१) प०—**केलें जें दुसरें तयें, निजसखीसाठीं, तया लावुनी,-**
**कोटी तीनच, त्या गभीर यमुनातीरावरी : चांगलें**

दु०—**प्रेमें मन्दिरही तसें निजसखीसाठीं तयें लावुनी,-**
**कोटी तीनच, त्या गभीर यमुनातीरावरी बांधिलें!**

—चरणान्तीं आशय न संपतां तो दुसऱ्या चरणांत अर्धवट घुसणें ही केशवसुतांची एक लकब आहे. प. मध्यें ती लागोपाठ दोन चरणांत येऊन दूरान्वय-दोष निर्माण होत होता. तो दुसऱ्या पाठानें कमी झाला. अभिव्यक्तीला थोडेंफार सरलत्व आलें.

(२) प०—**काडी एकच गन्धयुक्त, नमुनी तूं लाव प्रीतीप्रती,**

दु०—**काडी एकच गन्धयुक्त, नमुनी प्रीतीस तूं लाव ती,**

—या दोन्ही पाठांत सरसनिरस ठरविणें कठिण आहे.

## "माझें चित्त ठेवुनि घे"

प०—**झाली चूक खरी, परन्तु सदये! कीजे क्षमा सुन्दरी!**
**तुझें दास्य मला महीश्वरपणापेक्षां रुचे अन्तरीं!**

दु०—**झाली चूक खरी, परन्तु सदये! मातें क्षमा तूं करीं,**
**मच्चित्तावरतीं यथेष्ट कर गे स्वामित्व तूं सुन्दरी!**

—पहिल्या पाठांतील तुलनात्मक उद्गारांना अत्युक्तीचा जो दर्प होता, तो दुसऱ्या पाठांतील सरलोक्तीनें गेलेला आहे. 'सदये!' 'सुंदरी' या भावार्त संबोधनांची दाटी एकाच चरणांत लगोलग होत होती; त्यामुळें एक पादपूर्णार्थकत्वाकडे झुकत होतें, तो दोष टळला आहे.

## स्वप्नामध्यें स्वप्न

(१) प०—**वाटे तुज कीं माझे दिवस जहाले**
**स्वप्नापरि,...**

दु०—**वाटे तुज कीं माझे दिवस पळाले**
**स्वप्नापरि...**

—‘ माझे दिवस स्वप्नापरि जहाले ’ म्हणण्यापेक्षां ‘ पळाले ’ म्हणणें अधिक सार्थ आहे. स्वप्नाची भंगुरता ‘ पळाले ’ या अभिव्यक्तीनें अधिक चांगली व्यक्त होते.

**( २ ) प०—एका स्वप्नांतुन वा न कशांतुनही,**
**दु०—स्वप्नामधुनी किंवा न कशांतुनही,**

—‘ एका ’ हा प० मधील अनावश्यक शब्द टाळला.

**( ३ ) प०—आणिक मी या धरितों स्वकरामाजी**
**स्वर्णवालुकाकण,...**
**दु०—धरिले असती मी या स्वकरामाजी**
**स्वर्णवालुकाकण,...**

—‘ आणिक ’ हा निरर्थक शब्द टळून दुसरा पाठ अधिक गतिमान झालेला आहे.

## स्फूर्ति

**( १ ) प०—अमुच्या भाळीं कटकट लिहिली वटवट करुनी जगण्याची,**
**म्हणेल जग आम्हांस छाकटे पर्वा कसली मग त्याची !**
**दु०—अमुच्या भाळीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,**
**म्हणेल जग आम्हांस मद्यपी पर्वा कसली मग त्याची !**

—‘ वटवट करूनी जगण्याची ’ या शब्दांपेक्षां ‘ सदैव वटवट करण्याची ’ ही अभिव्यक्ति अधिक गतिमान झालेली आहे. ‘ वटवट करून जगण्याची ’ त्यांतील ‘ करून ’ मधील दीर्घ ऊ नें आशयाची चपलता कमी होत होती. ‘ छाकटे ’ या ग्राम्यतेकडे झुकणाऱ्या शब्दापेक्षां ‘ वटवटी ’ च्या आशयाशीं निगडित असा ‘ मद्यपी ’ हा नेमका शब्द कवीनें उपयोजिलेला आहे.

**( २ ) प०—दंग मानसीं होऊनीं—**
**दु०—होउनियां मग दंग मनीं**

—‘ हो ’ नंतर वृत्तसुखार्थ हेल काढून मात्रा भरून काढाव्या लागत होत्या; तो दोष दु. पाठानें टळला. स्वतांत गुंगण्याचा आशय प.पेक्षां दु. नें अधिक चांगला व्यक्त झाला.

**( ३ ) प०—म्हणुनी चिन्ता विझवितसों या पेयानें !**
**दु०—म्हणुनी घेतों झिंगुनियां या पानानें !**

—दंग गुंग होण्याची प्रतीति दु० पाठानेंच येते. पहिला पाठ थोडा कर्णकटुहि होता.

(४) प०—झगडूं त्यांच्याशीं समरीं;
दु०—झगडूं त्यांच्याशीं निकरीं

—'समरीं' या शब्दाचा आशय 'झगडूं' यांत येतोच म्हणून कवीनें तो शब्द गाळला आणि झगड्याची तीव्रता दर्शविणारा निकरीं हा शब्द उपयोजिला.

(५) प०—शब्दपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
दु०—पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,

—'शब्द' या पहिल्या पाठांतील शब्दापेक्षां 'पद्य' ह्या दुसऱ्या पाठांतील शब्दाच्या उच्चारणांत तरफेच्या कृतीशीं समांतर असा धक्का आहे, एवढेंच या दुरुस्त पाठाविषयीं म्हणतां येईल.

(६) प०—छंद फंद निर्बंध आमचे म्हणुनि जगाला ढवळूं द्या !
दु०—छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या !

—'म्हणुनि' हा पहिल्या पाठांतला फारसा अर्थ नसलेला शब्द टळून जगाला 'स्तिमित' हें अर्थगर्भ विशेषण योजण्यांत आलें. 'छंद फंद निर्बंध' या ऐवजीं 'छंद फंद उच्छृंखल' हे शब्द जणूं फुसांडत बाहेर येतात. उच्छृंखलच्या उच्चारणानें आशय बंडखोर उडी मारतो, असें जाणवतें.

## 'पण लक्षांत कोण घेतो ?' च्या कर्त्यास

प०—मित्रा ! उन्नतिचे पथांत...
दु०—धीरा ! उन्नतिचे पथांत...

—ह. ना. आपटे आणि केशवसुत यांचे संबंध सलगीचे होते. ही वैयक्तिक सलगी दर्शविणारें 'मित्रा !' हें संबोधन बदलण्यांत आणि 'धीरा !' हें अधिक व्यापक संबोधन योजण्यांत आशयाचा खाजगीपणा घालविण्याचा कवीचा हेतु दिसतो.

## राजा शांतनु

प०—टाकीं नभ भरुनि त्या स्व हांकांहीं
दु०—जाई नभ त्या भरून हांकांहीं

—दुरुस्त पाठ अधिक सफाईदार आहे. स्वहांकाहींसारखा गंगाजमनी समासहि त्यामुळें टळला आहे.

## सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि

प०—कांकीं, त्यांत सुरेख कांहिं दिसतें ऐसें मला भासलें !
दु०—कांकीं, त्या ध्वनिचें खरेंपण मला धोंड्यांत त्या भासलें !

—दुसऱ्या पाठांतील अभिव्यक्ति अधिक सुस्पष्ट आणि सरळ आहे.

## सिंहावलोकन

(१) प०—जरा वळुनि पाहतां मुख करूनि पाठीकडे,
कितीक हृदयें तशींच तगतील सांगा धडें ?

दु०—मुखा फिरवुनी, जरा वळुनि पाहतां मागुती,
कितीक हृदयें वदा चरकल्याविणें राहती ?

—दुसरा पाठ प्रासादिक आहे. पहिल्या पाठांतील 'धडें' शब्दानें जो दुधांत मिठाचा खडा पडल्यागत होत होतें, तें दुसऱ्या पाठानें टळलें आहे.

(२) प०—कीती रुचिर भूमिभाग तरि मागुते टाकिले,
दु०—प्रदेश किति मागुते रुचिर ते बरें टाकिले;

—पृथ्वी वृत्त आहे. पहिल्या पाठांतील यतिभंग दु० पाठांत टाळला आहे.

(३) प०—परन्तु हृदयास जाउनि खरोखरी झोंबती
दु०—परन्तु हृदयास जे त्वरित जाउनी झोंबती

—प० पाठांत यतिभंग होता तो दु० पाठानें टळला आहे. दुसऱ्या पाठांत आशयाची गति वाढून ती 'झोंबती' शब्दापर्यंत अधिक द्रुतगतीनें जाते.' खरोखरी ' हा गुळगुळीत शब्द दु० पाठानें टाळला.

(४) प०—किती अनुचितें करूनि पतितत्वही पावलों !
स्वयें बहकुनी निजाप्तहृदयें उगा टोंचिलीं !–

दु०—करुनि भलतें किती पतित हंत ! हे जाहलों !
स्वयें बहकुनी उगा स्वजनमानसें टोंचिलीं !–

—प० मधील 'निजाप्तहृदयें' या शब्दापेक्षां 'स्वजनमानसें' हा शब्द अधिक प्रासादिक आहे. प० मधील यतिभंग दु० नें टळले आहेत. दु० पाठ अधिक ओघवान आहे.

## नवा शिपाई

(१) प०—तेचि बाडगे जे आंखडिती प्रदेश साकल्याचा!

दु०—तेचि पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा!

—कवीच्या मूलप्रकृतीशीं 'बाडगे' हाच शब्द अधिक सुसंगत आहे. पण 'साकल्याचा' या सुसंस्कृत शब्दाशीं जुळवून घेण्यासाठीं 'बाडगे' ह्या ग्राम्यत्वाकडे झुकणाऱ्या शब्दापेक्षां 'पतित' हा शब्द अधिक बरा, असें कवीस वाटलें असावें.

(२) प०—मळयास माझ्या कुंपण करणें अगदीं न मला साहे!

दु०—मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे!

—स्वतः कुंपण करणें हें रुचत नाहींच; पण कोणत्याहि कारणास्तव ती 'पडणें' हेंहि मला आवडणार नाहीं, असा भाव व्यक्त करण्यासाठीं दु० पाठ जरा व्यापक पातळीवर नेलेला दिसतो.

(३) प०—देवहि नाहीं माझ्यावरता, मी पूजीं आपुल्याला,

दु०—पूजितसें मी कवणाला?–तर मी पूजीं अपुल्याला,

—केशवसुतांच्या मूर्तिभंजक प्रकृतीशीं प० पाठ सुसंगत आहे. पण त्यांच्या काळाचा विचार केल्यास हे अहंतेचे निदर्शक नास्तिक उद्गार खचितच टीकास्पद ठरले असते. दु० पाठांतील अभिव्यक्ति अधिक सौम्य म्हणावी लागेल.

(४) प०—अज्ञजनांचा हा हलवा
मिटविल का तो कलह लवा?
दंडभेद ते दुरि पळवा
शांतीचें साम्राज्य स्थापिति सामदाम दोघे हे,

दु०—अशी स्थिती ही असे जनीं
कलह कसा जाइल मिटुनी?
चिन्ता वागे हीच मनीं
शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,

—साम, दाम, दंड, भेद हे राजनीतींतील चार उपाय पुढच्या 'साम्राज्य' या कल्पनेमुळें कवीच्या मनांत प्रथम आले असावे. परंतु केशवसुतांचा 'नवा शिपाई' 'सामदामांचा' प्रेषित नाहीं. विशेषतः 'दाम' हा उपाय त्याच्या तत्त्वज्ञानांत बसणारा नाहीं. कारण 'नवा शिपाई' हा राजनैतिकतेपेक्षां नैतिकतेवर उभा आहे. कलह मिटून ऐक्य व्हावें, ही त्याची अंतरींची एकच चिंता होती. त्याच्या तत्त्वज्ञानांत 'मुत्सद्यांचे मार्ग' बसत नाहींत. तेव्हां दुसरा पाठच अधिक युक्त म्हटला पाहिजे. प० पाठांत 'हलवा–कलह लवा' असें जें वामनपंडिती यमक साधलेलें होतें, तें टाळण्यांत

आलें. या कवितेच्या रोखठोक आणि गतिमान आविष्कारांत असलें नटवें अलंकरण अस्थानींच ठरण्याजोगें होतें.

## सतारीचे बोल

(१) प०—धीर धरीं रे! धीरापोटीं,
असती मोठीं फळें गोमटीं!

दु०—धीर धरीं रे! धैर्यापोटीं
असती मोठीं फळें गोमटीं!

—'धीर' या विशेषणापासून मराठींत 'धैर्य' आणि 'धीर' अशीं दोन भाववाचक नामें रूढ आहेत. दोहोंचे अर्थ भिन्न आहेत. 'धैर्यापोटीं' ही दुरुस्ती स्वीकारल्यास मागेंहि 'धैर्य धरीं रे!' असा फरक हवा. परंतु 'धैर्या'पेक्षां 'धीर' म्हणजे निर्भयतेपेक्षां सोशीकपणाच आशयदृष्ट्या येथें अभिप्रेत दिसतो. तेव्हां मुद्रित प्रतींमधून दुरुस्त पाठ स्वीकारला गेला नाहीं, हें युक्तच.

(२) प०—शान्त वाजली गती शेवटीं,
शान्त धरित्री, शान्त निशीथीं.

दु०—शान्त वाजली गती शेवटीं
शान्त धरित्री, शान्त निशा ती,

—'शान्त' शब्दाच्या पुनरुक्तीनें आणि तारे–वारे यांसारख्या सुटसुटीत शब्द-योजनेनें या कडव्याला द्रुतगति प्राप्त झालेली आहे. 'निशीथीं' या अपरिचित, संस्कृतप्रचुर शब्दानें तींत भंग होत होता. 'निशा ती' या पाठामुळें लय वाढण्यास साहाय्य झालेलें आहे.

## "कोणीकडून? कोणीकडे?"

प०—अभावबुद्‌बुद तो जातो फुटून

दु०—भ्रमबुद्‌बुद तो जातो...

—तत्त्वज्ञानांतील, 'अभाव' या अमूर्त आणि अपरिचित शब्दापेक्षां 'भ्रम' या रूढ शब्दानें स्पष्टार्थत्व साधलें.

## आम्ही कोण?

(१) प०—स्पर्शावांचुनि आमुच्या न शकतें कांहीं जगीं द्यावया
सौंदर्यातिशया...

दु०—पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया
सौंदर्यातिशया...

—दु. पाठ अत्यंत सरस उतरलेला आहे. दु. पाठाला सिद्धान्तवाणीचें पाणी आहे. त्यांतील 'च' हा निश्चितार्थाचा आणि आत्मविश्वासाचा द्योतक आहे.

(२) प०—फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें तथ्य आम्ही निकें!

दु०—फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें!

—'फोलें' आणि 'सत्त्व' ह्या विरोधी कल्पना दु०नें नेमक्या स्पष्ट होतात. 'सत्त्व' शब्दाच्या उच्चारणांत जो ठसका आहे, तो आशयाची उत्कटता बिंबवितो.

## स्मरण आणि उत्कंठा

(१) प०—'मत्केली कलहंस हो!' सरस हें वाणी तुझी बोलली;

दु०—'माझे मानसहंस हो!' सरस हें वाणी तुझी बोलली;

—दु० पाठांतील संबोधन अधिक प्रासादिक आहे.

(२) प०—'हाकारा तर कर्णधार!' वदुनी मातें तुवां चुम्बिलें;

दु०—'माझे नाविक हो प्रवीण!' म्हणुनी मातें तुवां चुम्बिलें!

—'हाकारा तर कर्णधार!' या प० पाठानें ग्राम्यत्वाकडे झुकणारी कृतिसूचकता येत होती. दु. पाठांतील संबोधनानें ती टळून आशय भावनात्मक पातळीवर राहिला.

(३) प०—दोघें तींत परस्परां बिलगुनी तैं पावलों मज्जन!

दु०—ओघामाजि तिच्या प्रिये! उभयतां तैं पावलों मज्जन!

—दु० पाठानें शरीरसापेक्षता जाऊन प्रेमभावनेची उत्कटता वाढली.

## आईकरितां शोक

प०—रडतों तर घालुनियां ढोपरांत माथें!

दु०—रडतों गुडघ्यांत म्हणुनि घालुनी शिरातें!

—'गुडघ्यांत मान घालणें' या वाक्प्रचाराशीं आणि तत्सूचक कृतीशीं दु. पाठ अधिक सुसंगत आहे. 'ढोपरांत' हा कर्णकटु शब्दहि टळला.

## दूर कोठें एकला—

(१) प०—दुःख कसलें? बहु मनोभंग झाले,

दु०—आजवेरी बहु मनोभंग झाले,

—दु. मधील अभिव्यक्ति अधिक सरळ आहे. प. मधील प्रश्नोत्तरात्मक आविष्करण थोडें नाटकीच होतें.

(२) प०—हृदय हृदयाला जधीं खेळवीतें,
हृदय हृदयाला जधीं आळवीतें;
दु०—हृदय आत्म्याला जधीं खेळवीतें,
हृदय आत्म्याला जधीं आळवीतें;

—तत्वज्ञानांत 'चित्त' आणि 'आत्मा' वेगळा मानतात. आत्म्याला ज्ञानप्राप्ति करून देण्याचें साधन चित्त हें असतें. तद्वतच कवीनें 'आत्मा' आणि 'हृदय' यांचें नातें येथें मानलेलें दिसतें. 'हृदय हृदयाला' असें म्हटल्यानें 'एक हृदय दुसऱ्या हृदयाला' असा जो ध्वनि प्रतीत होतो, तोहि कवीला टाळावयाचा होता. तेव्हां व्याप्यव्यापक भाव ध्यानांत घेतां दु० पाठ युक्त वाटतो.

## हरपलें श्रेय

प०—होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळले परोपरी
दु०—होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळल्यें परोपरी

—व्याकरण दृष्ट्या दु० पाठ निर्दोष आहे. रचनासमत्वाच्या दृष्टीनें 'खेळल्यें' हें क्रियापदरूप युक्त वाटतें.

## शीर्षकांचा प्रश्न

मुद्रित प्रतींतून सर्व कवितांना शीर्षकें आढळून येतात. ह प्रतींत पुढील कवितांना शीर्षकें दिलेलीं नाहींत :—(१) जरी तूं ह्या येथें०—(२) नाहीं ज्या परि०—(३) जायाचें जग का०...(४) गोष्टी घराकडिल०—(५) जगामधिं या तुला०...(६) तत्वतः बघतां०—(७) कविच्या हृदयीं जसे०—(८) दूर कोठें एकला०—(९) तहान भूक आरंभीं०—(१०) तूझें नाम मुखीं (११) आई! आई! (१२) दुर्मुखलेला (१३) झपूर्झा (१४) राजा शांतनु.

यांतील ११ ते १४ सोडून बाकीच्या कवितांचीं मुद्रित प्रतींतील शीर्षकें प्रथमचरणरूप आहेत. प्रथमचरणरूप शीर्षकांची प्रथा तत्कालीं नव्हतीच, असें नाहीं, कारण 'तिनें जातां चुम्बिलें असे यातें' असें शीर्षक मुद्रित प्रतींप्रमाणें हमध्येंहि आढळतें.

९५२९४

हमध्यें हीं शीर्षकें नाहींत, याचा अर्थ ह प्रत तैयार झाली, तेंव्हां तीं पक्कीं झालीं नव्हतीं; मुद्रणासाठीं प्रती करून देतांना कवीनें तीं दिलीं असतील किंवा मुद्रित प्रतींच्या संपादकांनीं तीं स्वतंत्रपणें दिलीं असतील, असा होईल. त्या काळीं प्रथमचरणरूप शीर्षकांची प्रथा कमी होती, हें ध्यानांत घेतां संपादकांनींच हीं शीर्षकें दिलीं असण्याचा अधिक संभव आहे. 'स्फुट' या कवितेचें 'ह' मधील शीर्षक 'स्फुट श्लोक' असें आहे.

**माझा अन्त** :—या कवितेची एक रफ प्रत आहे. तिच्यावरील शीर्षक खादडल्यागत झालेलें आहे. पण तें प्रथम 'माझा मृत्यु' असें असावें. या प्रतीवर कोपऱ्यांत 'पुष्कळ बदललें आहे. शेवटाकडील एक पत्र पहा' असा मोडींत पेन्सिलीचा शेरा आहे.

**वियुक्ताचा उद्गार** :—या कवितेच्या पूर्ण तीन आणि एक उभी फाटलेली अर्धवट अशा चार प्रती ह मध्यें आहेत. तींमधील एकींत 'चिरवियुक्ताचा उद्गार' असें शीर्षक आहे. प्रा. रा. श्री. जोग यांनीं तें मान्य केलेलें दिसतें (केशवसुत, पृ. १४४). **आ** आणि **दा** मध्यें या कवितेचीं दोन पाठान्तरें आहेत. मात्र शीर्षकें 'वियुक्ताचा उद्गार' अशींच आहेत. **पं**प्रतींत 'चिरवियुक्ताचा उद्गार' असें शीर्षक आहे. ह मधील बहुसंख्य प्रतींचा विचार केल्यास 'वियुक्ताचा उद्गार' असेंच शीर्षक कवीस अभिप्रेत असावें, असें दिसतें.

**मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस** :—ह आणि **आ** या प्रतींतील शीर्षकांत 'मुलांस' असा अ० व० सानुस्वार शब्द आहे, तर **दा** आणि **पं** मध्यें 'मुलास' असा निरनुस्वार ए० व० शब्द आहे. कवितेंत 'मुलें' 'बालकें' 'बाळांप्रत' असे उल्लेख येतात; तेव्हां 'मुलांस' हें अ० व० रूपच युक्त वाटतें. प्रा. रा. श्री. जोग यांनीं अ० व० शब्दच गृहीत धरलेला आहे. (केशवसुत, पृ० २३१).

## सदोष पाठान्तरांची चर्चा

प्रथम जाड ठशांत अपपाठ दिले असून पुढें कंसांत योग्य पाठ दिले आहेत.

**कविता आणि प्रीति**

**दा, पं.** :—मधें अंगना, स्पृष्ट ज्या यौवनानें, **नजाऽव्याजरूपास** साध्या मदानें.

(ह, आ :-**निजाऽव्याजरूपास**).

**प्रियेचें ध्यान**

**पं.** :—पुसाया **तें** लागे अहह ! नयनां तोच मजला ! (ह, आ, **दा** :–**तैं**)

### किरातार्जुनीय-सर्ग १ ला

दा, पं :—इच्छा **ती** धरूनी मनीं, अलसही टाकुनि, रात्रंदिन ( ह, आ :— **तो**-ह व आ मधील 'तो' पाठच युक्त आहे. 'धरूनी' 'टाकुनि' यांचा 'तो' हा कर्ता असून त्याचा दर्शक शब्द 'दुर्योधन' पुढील चरणांत आलेला आहे. )

### धूमकेतु आणि महाकवि

दा, पं :—**विश्रांतीचे** तमांत शिरतां आपुल्याचि नांवें ! ( ह, आ :— **विश्वान्तीचे** ).

### स्फूर्ति

दा, पं :—देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां **कळवूं** द्या !

( ह, आ :—**कवळूं**–या कवितेच्या दोन प्रती हमध्यें उपलब्ध आहेत. दोहोंत 'कवळूं' [ = आत्मसात् करूं ] हाच पाठ आहे. )

### दुर्मुखलेला

पं. :—माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया, चालावयाचा पुढें ( ह, आ, दा :— **मुखामधुनि या**–पंमधील पाठ मान्य केल्यास त्यांतील 'या' सानुस्वार पाहिजे. एकंदरींत मूळ पाठच युक्त. )

### कांहीं स्वकृत वचनें

आ, पं :—बोल लावितो दैवास त्यास म्हणावें **का पुरुष**. ( ह, दा :— **कापुरुष.**—'का पुरुष' हा पाठ मान्य केल्यास तो प्रश्नचिन्हयुक्त पाहिजे. मूळचा 'कापुरुष' पाठच अन्वर्थक आहे. )

### तत्त्वतः बघतां नामावेगळा

आ, दा, पं :—**भावशब्दस्पर्शहीन** । तैसे रंगरसगंधावांचुन ( ह :—**भाव शब्दस्पर्शहीन** ।—'भाव' हे शब्द, स्पर्श, रंग, रस, आणि गंधावांचून आहेत, असा आशय असल्यानें हमधील 'भाव' शब्द तोडून लिहिलेला पाठच युक्त आहे. )

### रुष्ट सुन्दरीस

आ, दा, पं :—विषण्ण तो मग विषवृक्षाचीं **फळें** ( ह :—**फलें**– 'फलें' हा पाठ अधिक तत्कालीन वाटतो. )

### फुलपाखरूं

दा, पं :—ताई :—फार नाजुक आहे, **कोमल** आहे;

(ह, आ :—**कोमळ** :—हे शब्द ताईच्या म्ह. एका तत्कालीन स्त्रीच्या तोंडचे आहेत हें ध्यानांत घेतां ' ळ 'कारच युक्त वाटतो. )

**किरातार्जुनीय—सर्ग १ ला**

**पं** :—**दानावांचुन** साम तें नच कधीं सम्पूर्ण त्याचें असे, (**ह, आ, दा** :—**दानावांचुनि**—इकारयुक्त पाठच तत्कालीन वाटतो. )

**जगामधीं या तुला०—**

**दा, पं** :—जों कालाच्या मंजुळ घण्टाटंकारे सुचविलें (**ह, आ** :—**मञ्जुल** : संस्कृत धर्तीवर ' ल ' कार योजण्याची केशवसुती लकब ध्यानांत घेतां **ह** आणि **आ** मधील पाठच युक्त वाटतो. )

## ह्रस्वदीर्घ

कवितांचें मुद्रण करतांना ह्रस्वदीर्घ किंवा व्यंजनांची पायमोड इ. विषयीं साक्षेप न बाळगिल्यास कवीच्या पदरीं वृत्तभंगाचा दोष निष्कारण बांधला जातो. केशवसुतांच्या बाबतींत हा प्रकार झालेला आहे. पुढें तुलनात्मक मांडणी करून कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. प्रथम, चरणासह प्रमादयुक्त पाठ दिला असून पुढें कंसांत युक्त पाठ दिला आहे. **ह** प्रतीशीं महत्त्वाच्या मुद्रितप्रतींपैकीं **आ** प्रत बहुतेक स्थळीं जुळते, असें दिसून येईल.

**कवितेचें प्रयोजन**

**दा, पं** :—धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हें **दूरहि** भूवरी ! (**ह, आ**:—**दूरही** ).

**किरातार्जुनीय—सर्ग १ ला**

( १ ) **दा, पं** :—निःशंकाकृतिला धरी **वरिवरि**, शंकी जरी तो मनीं; (**ह, आ** :—**वरिवरी** ).

( २ ) **पं** :—त्राणोपाय करूनि, तो **हटवुनि** बाधा दयावान् दुरी (**ह, आ, दा** :—**हटवुनी** ).

**गोष्टी घराकडिल०—**

**दा, पं** :—सानंद सुस्थित **घरांतील** सर्व गाऊं ! (**ह, आ** :—**घरांतिल** )

**फार दिवसांनीं भेट**

( १ ) **दा, पं** :—**प्रणयसिंधूला** भरती आली ॥ ध्रु ॥ (**ह, आ** :—**प्रणयसिंधुला** ).

( २ ) **दा, पं**:—**मृत्यूच** दोघां त्याच सुवेळीं ! (**ह, आ** :—**मृत्युच** ).

**सतारीचे बोल**

पं :—मूठ **वळुनी** मीं हात हिसकिला; ( ह, आ, दा :—**वळुनि** ).

**तुतारी**

दा, पं :—एक तुतारी द्या मज **आणुनी** ( ह, आ :—**आणुनि** ).

**फुलांची पखरण**

पं :—सकाळ जाईल संपून, ( ह, आ, दा :—**जाइल** )

**पुष्पाप्रत**

( १ ) दा, पं :—पुष्पा सुन्दर **किती** तूं दिससी ! ( ह, आ :—**किति** ).

( २ ) आ, दा, पं :—रम्य तुझें बा जिणें **कितीतरि** ! ( ह:—**कितितरी** ! )

**जगामधीं या तुला०—**

दा, पं :—तुझें बघुनि ते **हृदयीं** धीरता घेतिल मग लागली, ( ह, आ :- **हृदयिं** ).

**रूढि-सृष्टि-कलि ?**

दा, पं :—सृष्टीचे **अमृतध्वनि** दुरुनि जे कानांवरी त्यांचिया ( ह, आ :- **अमृतध्वनी** ).

**घुबड**

दा, पं :—घूघू ! घूघू ! चाले त्याचा घूघू भीषण घुत्कार ! ( ह, आ :- **घूत्कार**-हा शब्द प्रत्येक कडव्याच्या शेवटीं येतो, इतर कडव्यांतून तो **दा** आणि **पं** प्रतींमध्येंसुद्धां दीर्घ घूकारयुक्तच आहे. शिवाय मागें पृ. ७ आणि ८ वर याचा अधिक खुलासा झालेलाच आहे. )

**मुळामुठेच्या तीरावर**

पं :—रमणीयपणा स्वयें **मूर्तिमान** मत्प्रियकर होता होता !-( ह, आ, दा :- **मूर्तिमान्** ).

**म्हातारी**

पं :—वद असशी का तूं तरंगत **वातावरणांतून** ? ( ह, आ, दा :- **वातावरणांतून्** ).

**मूर्तिभंजन**

दा. पं :—व्यर्थ पूजाद्रव्यें त्यांस **वाहूनियां** ( ह, आ :—**वाहूनीयां**- अभंग छंदांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार दीर्घ लयीचा असतो; तेव्हां ह, आणि **आ** मधील पाठ युक्त. )

### फुलांची पखरण

**आ, दा, पं** :—पहा फुलांची पखरण **झिप्** ॥ध्रु॥ (**ह** :—**झिप्प्**—या गाण्यांतील 'पहिल्या चरणांतील 'टिप् पोरी टिप्' शीं जुळण्यासाठीं सर्व संपादकांनीं 'झिप्प्' मधील द्वित्व एकेरी बनविलेलें असावें. टाळीच्या ठेक्यावर नाचून म्हणावयाच्या, मुलींच्या पारंपरिक गाण्यासारखीच थेट या गाण्याची चाल आहे. तसा ठेका धरून नीट अवसान सोडल्यास द्वित्वयुक्त पाठच युक्त वाटतो. 'झिप्प्' असा शब्द प्रस्तुत गाण्यांत दोनदां येतो आणि **ह** मध्यें या गाण्याच्या दोन प्रती आहेत. चारी स्थळीं कवीनें 'झिप्प्' असेंच लिहिलेलें आहे.)

## अनुस्वार

सध्यां मान्यता पावलेल्या मराठी लेखनपद्धतीनुसार पाहिल्यास पुढें केलेलें अनुस्वारांसंबंधींचें विवेचन अनाठायीं वाटण्याचा संभव आहे. पण कवीचा मूळ पाठ महत्त्वाचा असतो. शिवाय अनुस्वाराच्या जादा आगमानें वा अभावानें कवीच्या मूळच्या अभिप्रायांतहि बदल होतो, हें ध्यानांत घेणें आवश्यक आहे. पुढील तुलनात्मक मांडणीवरून ही गोष्ट उघड होण्याजोगी आहे.

### उगवत असलेल्या सूर्यास

ह, आ :—अनुसरत असें मी हासुनी **पद्मिनींस,**

दा, पं :—अनुसरत असें मी हासुनी **पद्मिनीस,**

—मागील चरणांतून समांतरच कल्पना आहेत. 'खगांचें', 'लतांचें' असे अ. व. शब्द तेथें आलेले आहेत. तेव्हां 'पद्मिनींस' हा सानुस्वार अ. व. शब्दच युक्त आहे.

### आम्ही कोण ?

ह. आ : पाणिस्पर्शच आमुचा शकतसे **वस्तूंप्रती** द्यावया—

दा. पं : पाणिस्पर्शच आमुचा शकतसे **वस्तूप्रती** द्यावया—

—अ. व. पाठच अधिक आशयघन वाटतो.

### आगबोटीच्या कांठाशीं

ह :—शिवायाचीं **देहां** मग अपुलिया नाहिंत कदा !

आ, दा, पं :—शिवायाचीं **देहा** मग अपुलिया नाहिंत कदा !

—'**देहां**' असें अ. व. च पाहिजे. पुढें चवथ्या चरणांत 'देहांवरि' असें सानुस्वार अ. व. च योजिलेलें आहे.

## दिवा आणि तारा

(१) ह :......तुझा रात्रौ कितीसा असे। **लोकांला** उपयोग...

**आ, दा, पं**...तुझा रात्रौ कितीसा असे। **लोकाला** उपयोग–सानुस्वार 'लोकांला' हा अ. व. पाठच युक्त. तु० 'ती **सकलांला** समान जाची (**तुतारी**)

(२) ह, आ :—**ब्रह्मांडांस** परंतु मी उजळितों...

दा, पं :—**ब्रह्मांडास** परंतु मी उजळितों...

—पूर्वीच्या चरणांत आलेल्या 'भांडीं', 'डबे' इ० शब्दांच्या अनुरोधानें 'ब्रह्मांडांस' हा अ. व. पाठच युक्त वाटतो.

(३) ह, आ : "दीपाच्या लिहितोस तूं द्युतिबलें कीं **तारकाच्या** बरें ?"

दा, पं : "दीपाच्या लिहितोस तूं द्युतिबलें कीं **तारकांच्या** बरें ?"

—'दीपाच्या' या शब्दाशीं जुळण्याच्या दृष्टीने 'तारकाच्या' हा ए. व. निरनुस्वार पाठ युक्त वाटतो. 'एका' ताऱ्याचा 'एका' दिव्याशीं येथें वाद चालू आहे, हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे.

## जायाचें जग का असेंच ?

ह, आ :—तो आहे, मग सन्मनें हळळती दुःखामधें **कां** तर ?

दा, पं. :—तो आहे, मग सन्मनें हळळती दुःखामधें **का** तर ?

—कारणबोधक 'कां' वर अनुस्वार पाहिजे.

## मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस

ह, आ :—हें केव्हां शिवतें तरी तुमचिया **का** रुक्ष रे अन्तरीं ?

दा, पं :—हें केव्हां शिवतें तरी तुमचिया **कां** रुक्ष रे अन्तरीं ?

'का' कारणबोधक नसल्यानें, 'का' (काय ?) हा निरनुस्वारच शब्द युक्त.

## उत्तेजनाचे दोन शब्द

ह, दा :—म्हणून उद्यम सोडुं नको। जोंवरि **देहीं** प्राण !

पं :—म्हणून उद्यम सोडुं नको। जोंवरि **देही** प्राण !

—'देहीं' हा सप्तम्यन्त सानुस्वार पाठच युक्त.

## घड्याळ

ह, दा :—घड्याळ बोले अपुल्या **वाचें**

पं :—घड्याळ बोले अपुल्या **वाचे**

—'वाचें' हें जुनें तृतीयेचें रूप युक्त.

### कवितेचें प्रयोजन

ह, आ :—हें **कोणीं** म्हणतां जवें कविमनीं खेदोर्मि हेलावल्या

दा, पं :—हें **कोणी** म्हणतां......

—येथें 'कोणीं' असा सानुस्वार तृ०चा पाठच युक्त.

### स्वप्नामध्यें स्वप्न

ह, आ :—सर्व आम्ही जें बघतों करितों वा जें। स्वप्नांतिल तें स्वप्नच, सखये **माझे** !

दा, पं :—सर्व अम्ही जें........। स्वप्नांतिल तें...सखये **माझें** !

—'हे माझे सखये' हें संबोधन येथें अभिप्रेत आहे. म्हणून 'माझे' हा शब्द निरनुस्वारच युक्त. 'माझे' हें 'सखये' या शब्दाशीं संबंधित नाहीं असें मानल्यास तें 'स्वप्नाशीं' संबंधित मानावें लागेल, मग '**माझें**' याऐवजीं 'आमचें' असा अ. व. शब्द योजणें अवश्य होतें.

### दिवा आणि तारा

ह :— तारा **तों** वरूनी दिग्यास वदला......

आ, दा, पं :—तारा **तो** वरूनी दिग्यास वदला......

—'तेवढ्यांत' या अर्थी 'तों' असा सानुस्वार शब्दच अभिप्रेत दिसतो.

### जरी तूं ह्या येथें असतिस

ह :—**पुरीं** हाताच्यानें नच **करवती** गे हरहर !

आ, दा, पं : **पुरीं** हाताच्यानें नच **करवतीं** गे हरहर !

—निरनुस्वार 'करवती' हाच पाठ बरोबर; कारण "प्रिये, थरथरणाऱ्या हातांनीं मला आतां (अधुना) गोड संबोधनें पत्रावर पुरीं करवत नाहींत" (पुरीं नच करवती), असा आशय येथें व्यक्त केलेला आहे. पुढील श्लोकांत

पुरीं हाताच्यानें नच **करवती** तीं प्रिय जरी

न वा डोळ्यांच्यानीं क्षण **बघवती** तेविं अपुरीं

असे चरण आहेत. हा सारा संदर्भ ध्यानांत घेतल्यास येथें 'पुरीं करवलीं नसतीं' असा भूतकाळ दर्शवायचा नसून वर्तमानकाळच दर्शवावयाचा आहे, हेंहि स्पष्ट होईल.

### गोष्टी घराकडिल

ह, आ :—**ऐकें** पलीकडुनि बेडुक शेतभातीं

दा, पं :—**ऐके** पलीकडुनि बेडुक शेतभातीं

—'बेडूक' ऐकत नसून कवि आपल्या मित्राला 'शेतांतले बेडकांचें पर्जन्यसूक्त' ऐकावयास सांगत आहे. तेव्हां 'ऐकें' हें द्वि. पु. सानुस्वार रूपच युक्त.

**घड्याळ**

ह, दा :—त्याचें म्हणणें ध्यानीं **घेईं**

पं :—त्याचें म्हणणें ध्यानीं **घेई**

—येथें 'घेईं' हें क्रि. रूप द्वि. पु. ए. व. आहे, 'त्याचें म्हणणें तूं ध्यानीं घे' असा आशय आहे, तेव्हां 'घेईं' हें सानुस्वार रूपच युक्त.

**वियोगामुळें**

( १ ) ह:—**होती** नीरस तीं परी गुण तुझे गोडीस देती सदा;

आ, दा, पं:— **होतीं** नीरस तीं परी गुण तुझे गोडीस देती सदा;

—या चरणांतील 'तीं' चा संदर्भ 'इक्षुदंडें' या पूर्वीच्या चरणांतील शब्दाकडे आहे. 'इक्षुदंडें नीरस होती ( होतात ), पण तुझे गुण सदा गोड असतात' असा वर्तमानकाळींच अभिप्राय आहे. तेव्हां निरनुस्वार 'होती' हें रूपच युक्त.

( २ ) ह, आ :—वेडापीरच जाहलों जिवलगे **आहें** वियोगामुळें !

दा, पं. :—वेडापीरच जाहलों जिवलगे **आहे** वियोगामुळें !

—'आहें' याचा संबंध 'मी' या कर्त्याकडे आहे, तेव्हां सानुस्वार पाठच युक्त.

**किरातार्जुनीय-सर्ग १ ला**

ह, आ :—स्वबान्धवां तें **वदला** सविस्तर

दा, पं :—स्वबान्धवां तें **वदलां** सविस्तर

—'युधिष्ठिर' हा 'वदला' या क्रि. चा ए. व. कर्ता आहे, तेव्हां निरनुस्वार पाठ युक्त.

**आगबोटीच्या कांठाशीं०—**

ह, आ, दा :—प्रभेच्या लालीनें खुलत असती हे **जलधर**

पं. :—..........................असती हे **जलचर**

—आकाशांत 'जलधर'च खुलणार; 'जलचर' नव्हेत.

पंप्रतींत अनुस्वारांसंबंधीं एकूण अराजकच आहे. कांहीं उदा०—

( १ ) रवि येत **असें** उदयातें ( भृंग ).

( २ ) तरी तिमिर हें विरल **असें** ( भृंग ).

( ३ ) **ओतितसें** हेची बोल ( भृंग ).

( ४ ) छायेला जल तें **असें** जर कुठें फेंसास त्या गाळित ( पर्जन्याप्रत ).

( ५ ) टाकितां, सुमनियुक्त तें **घडें** ( स्फुट : लाह्यांवर कूट ).

( ६ ) स्वरूप सत्य तुझें। मुळींही तें मजला **नुमजें** ( म्हातारी ).

( ७ ) परन्तु सरका विशंक **पुढतें** ( तुतारी ).

( ८ ) याची खूणच गान जें **निघतसें** तें साच जाणा मनीं; (कवितेचें प्रयोजन).

( ९ ) **मळ्यांस** माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे ! ( नवा शिपाई ).

(१०) " या वेळेस कसें कवे ! तुज सुचे गाणें न **माते** कळे ! "
( कवितेचें प्रयोजन )

(११) मच्चित्ताच्या **क्षितिजावरती** ( पुष्पाप्रत ).

**पं**प्रत आणि **दा**प्रत यांतील प्रमादयुक्त पाठांमध्यें विलक्षण साम्य आहे. उदा०—" कोणीकडून ?–कोणीकडे ? " मध्यें 'कोठें **जमइन** कैसा सुटून ? ', तर ह, **आ** मध्यें मात्र '**जाइन**' हा योग्य पाठ आहे. ह्यांतील कांहीं मुद्रणदोष ठरूं शकतील.

## विरामाचिन्हें

हस्तलिखितांत विरामचिह्नांविषयीं शक्यतितकी दक्षता घेतलेली दिसून येते. येथें कांहीं फेरफारांची नोंद घ्यावयाची आहे.

**गोष्टी घराकडिल—**

ह : त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभें
तो सर्वदा जरि म्हणे मज पुत्र लोभें !

**आ, दा, पं :** ..................पुत्र शोभें !
..................पुत्र लोभें !

—दोन्ही चरण मिळून एकच संकेतार्थी वाक्य आहे, तेव्हां ह प्रतींतील दोन्ही चरणानंतर एकदांच येणारें उद्गारचिह्न युक्त ठरतें.

**कोठें जातोस ?**

ह, **आ** :—" घरीं जिवलग ती वाट बघत आहे ! "

**दा, पं** :—" ........................आहे ? "

—उद्गारचिह्नच युक्त.

**मुलांस झोडपणाऱ्या०—**

ह :—कोणें मूर्खपणें गुरुपण तुला क्रूरा ! असे रे दिलें !

**आ, दा, पं** :—............क्रूरा ! असे ` दिलें ?

—चरणान्तींचें प्रश्नचिह्न चुकीचें नसलें, तरी आशयदृष्ट्या उद्गारचिह्नच युक्त वाटतें.

**काव्य कोणाचें ?**

(१) **ह, आ** :—म्हणे कविला " ही रम्य फार आहे ! "

**दा, पं** :—......................फार आहे ? "

—चरणान्तींचें **दा, पं** या प्रतींतील चिह्न चुकीचें आहे.

(२) **ह, आ** :—तीच कारण त्या शक्ति असे पाहीं ! "

**दा, पं** :—......................असे पाहीं "

—दा आणि पं प्रतींतून चरणान्तींचें चिह्नच गळालें आहे.

**म्हातारी**

**ह, आ** :—खपुष्प तूं असशी काय गे ?—सांगुनि दे मजसी.

**दा, पं** :—..................काय गे—सांगुनि दे मजसी.

—' काय गे ' नंतरचें प्रश्नचिह्न दा, पं मध्यें सुटलें आहे.

**आम्ही कोण ?**

**ह, आ** :—ते आम्हीच, सुधा कृतींमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें.

**दा, पं**:—ते आम्हीच सुधा......................
ते आम्हीच शरण्य मंगल......................

—दा आणि पं प्रतींत पहिल्या चरणांतील ' आम्हीच ' आणि दुसऱ्या चरणांतील ' शरण्य ' या शब्दांनंतरचे स्वल्पविराम सुटले आहेत.

**घुबड**

**ह, आ** :—गुणरूपवती प्रिया निमाली !—झालें सारें निस्सार !

**दा, पं** :—.............................सारें निस्सार

—चरणान्तींचें उद्गारचिह्न दा आणि पं मधून सुटलें आहे.

**राजा शांतनु**

**ह, आ** :—वचन दिलें, ' तुमच्याशीं सुनेचिया जुळिन साच नात्यातें.'

**दा, पं** :—वचन दिलें,तुमच्याशीं सुनेचिया जुळिन साच नात्यातें.

—दा आणि पं मध्यें अवतरणचिह्न सुटलें आहे.

## कांहीं स्वकृत वचनें

ह :—पैशासाठीं न्याय टाकी.
स्वर्गीं शून्य त्याची बाकी.

आ, दा, पं :—पैशासाठीं न्याय टाकी !
स्वर्गीं शून्य त्याची बाकी.

—मुद्रित प्रतींतील विराम बरोबर नाहींत. दोन्ही चरण मिळून एकच मिश्र वाक्य आहे. उद्गारचिह्न ' बाकी ' शब्दानंतर येतें; तर चाललें असतें.

## कामान्धत्व

ह :–लोकांचीं नयनें तशीं न असती कामीजनांचीं खरीं;
त्रस्तें जीं अवलोकनें,

आ, दा, पं :—लोकांचीं नयनें............खरीं
त्रस्तें जीं अवलोकनें,.......

—पहिल्या चरणांतील ' खरीं ' या शब्दानंतर हप्रतीप्रमाणें अपूर्णविरामच पाहिजे; कारण तेथें अपूर्ण राहिलेला आशय ( नयनांची आणखी माहिती ) पुढील चरणांतून चालूच आहे.

## सतारीचे बोल

ह :— लोचनांतुनी तोय कितिकदा
ऐकत असतां दिड दा, दिड दा ॥ ६ ॥
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां दिड दा, दिड दा ! ॥ ९ ॥

आ, दा, पं :—लोचनांतुनी..............
ऐकत असतां — दिड दा, दिड दा ॥ ६ ॥
विसरुनि गेलों...........
ऐकत असतां — दिड दा, दिड दा ॥ ९ ॥

—वरील दोन कडव्यांतील ' ऐकत असतां ' नंतर हप्रतींत अपसारण चिह्न ( — ) नाहीं; मुद्रित प्रतींतून तें आहे. या कवितेचीं अन्य कडवीं संपताना ' दिड दा ', ' दिड दा ' या शब्दसंहतींपूर्वीं ' ध्वनी ते ' ' ध्वनि हे '' रव ते'– इ० जे शब्द येतात, त्यांच्यापुढें अपसारणचिह्न आहे, कारण तेथें ' ते ' ' हे ' या शब्दांचा खुलासाच ' दिड दा, दिड दा ' हा आहे. परंतु ' ऐकत असतां ' याचें कर्मच ' दिड दा, दिड दा ' आहे म्हणजेच ' दिड दा, दिड दा ऐकत असतां ' हें एकच वाक्यांग आहे. तेव्हां त्यांना अलग करणारें अपसारण चिह्न हमध्यें नाहीं, तेंच प्रयुक्त ठरतें.

किरातार्जुनीय-सर्ग १ ला

ह, आ, दा :—होती मित्र तिघे, परस्पर कसे व्हावेत ते बाधते ?

पं :—होती मित्र......................ते बाधते !

—प्रश्नचिह्नच बरोबर वाटतें.

गोष्टी घराकडिल

ह, आ, दा :—या शांततेंत गमतें कुटिर्तेच टाळ !

पं :—या शांततेंत गमतें कुटिर्तेच टाळ !

—उद्गारचिह्नच युक्त.

नवा शिपाई

ह, आ, दा :—परि अन्यां बोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक !

पं :—......................कीं प्रत्येक ?

—उद्गारचिह्नच युक्त आहे.

## कांहीं चिन्त्य पाठ

हरपलें श्रेय

ह :—**स्वभास** दावुनि । परि तें झटदिनि। जाई लोपुनि ।

( आ, दा, पं :—**स्वभाव**—पं प्रतींत तळटीपेंत ‘ स्वभास ’ हा पाठ नोंदलेला आहे; पण मूळ संहितेंत स्वीकारलेला नाहीं. परंतु ‘ स्वभास ’ हाच पाठ युक्त वाटतो. या कवितेची पेन्सिलींतली एक कच्ची प्रत हमध्यें आहे. तींत प्रथम ‘ **भास** दाउनी । परी तें क्षणीं । जाय लोपुनी ’ असा पाठ होता. सध्या प्रचलित असलेला पाठ त्याच प्रतींत दुरुस्त करून बाजूस लिहिलेला आहे. या कच्च्या प्रतींत या कवितेचीं कडवीं पुढीलप्रमाणें आहेत :—( १ ) होतें अजाण...( २ ) स्वपति चितेवरि...( ३ ) प्राप्त जाहलें जें ( ४ ) किरण झरोक्यांतून ( ५ ) जेथें ओढे...‘ भीडभाड ’ हें प्रचलित संहितेंतील ५ वें कडवें या कच्च्या प्रतींत नाहीं. कडव्यांचा क्रमहि वेगळा आहे.)

दुर्मुखलेला

ह :—आहे सुन्दर तो सदा **सरसवाग्निष्यन्द** चोहींकडे ! ( आ, दा, पं :—**सरसवाङ्निष्यन्द**—सवर्गीय अनुनासिक आणून मुद्रित प्रतींतून पाठ सुधारण्याचा प्रयत्न झालेला आहे. पण हमधील पाठ व्याकरणदुष्ट नाहीं. )

स्फूर्ति

ह :—सत्त्वाचा ‘ उदयोस्तु ’ करा

( आ, दा, पं :—उदयोऽस्तु—व्याकरणदृष्ट्या दोन्ही पाठ बरोबर आहेत. )

### उत्तेजनाचे दोन शब्द

ह :—दिसशिल **जगास** देव (**दा, पं** :—**जगासि**—**आ** मध्यें ही कविता नाहीं. जुन्या काव्यसरणीनुसार इकारयुक्त पाठच उजवा म्हटला पाहिजे.)

### दिव्य ठिणगी

ह :—**येथें** येउनि पोंचतां, बलि दिला ज्वालेस त्या मीं किती,

(**आ, दा, पं** :—**तेथें** : दोन्ही पाठ अर्थदृष्ट्या वा वृत्तदृष्ट्या खटकत नाहींत. पण आशयदृष्ट्या ह मधील पाठ ग्राह्य वाटतो.)

### तुतारी

ह :—नावें आपुलीं त्यांवर नोंदा.

(**आ, दा, पं** :—निजनामें त्यावरतीं नोंदा—ह प्रतीमध्यें एकच पाठ आहे. प्रसिद्धीस देण्यापूर्वी कवीनें वा कदाचित् संपादकांनीं मूळ पाठांत फेर केला असावा.)

### गोष्टी घराकडील

ह, आ :—वाटेवरी **चतरशिंगिच्या** न तैशी.

(**दा, पं** :—'चतुरशिंगी'. 'चतरशिंगी' असा बोलण्याचा संप्रदाय पुण्यांत रूढ आहे, तोच मूळ प्रतींत आहे. **दा** आणि **पं** प्रतींतील पाठ हें नकळत घडलेलें अर्वाचीकरण असावें.)

### मुळामुठेच्या तीरावर

ह :—हिंडत हिंडत सुटल्या केशी फुलें गुम्फिसी वनांतलीं! । तीरीं जाउनि **त्यांचा** अंजलि सोडुनि देसी रडत जलीं?

(**आ, दा, पं** :—**त्यांच्या** : संस्कृत अञ्जलि हा शब्द पु. आहे. प्राकृतांत व मराठींत त्याचा लिंगपालट झालेला आहे. अशा शब्दांची उपयोजना संस्कृत धर्तीवर करण्याची केशवसुतांची लकब आहे. उदा. नेत्रें—**कामान्धत्व**, नयनें—**माझा अन्त**. तेव्हां हमधील पाठच युक्त ठरतो.)

### निशाणाची प्रशंसा

(१) ह :—कोण नेतसे **समराला**

सांग बरें रणधीर,

(**आ, दा, पं** :—**समरास** : अवसानाच्या दृष्टीनें पाहिल्यास ह मधील दीर्घान्त पाठ बरा वाटतो.)

(२) ह :—भक्ति जिथें, दिव्यत्व जिथें
**जेथें उत्सव** फार,

(**आ, दा, पं :—उत्सव जेथें** : 'वीर्य जिथें, ऐश्वर्य जिथें, जेथें जयजयकार' हा दोह्याच्या पुढील चरणांतील पदक्रम ध्यानांत घेतल्यास रचनासमत्वाच्या दृष्टीनें हमधील पाठच युक्त वाटतो.)

**झपूर्झा**

ह :—**प्रेमें गा हे ध्वनि आतां**–वाडें कोडें गा आतां!

(**आ, दा, पं** :—वाडें कोडें गा आतां!—ठळक ठशांतील चरणक हमध्यें जादा आहे. हमधील या कवितेची प्रत कच्च्या स्वरूपाची आहे. कवीनें रचनासमत्वाच्या दृष्टीनें हा वाढीव चरण गाळून कवितेचें पुनर्लेखन केलें असणें शक्य आहे.)

**नवा शिपाई**

पंप्रतींत 'कोठें ही जा पायाखालीं तृणावृता भू दिसते' हा चरण अजिबात सुटला आहे.

**निशाणाची प्रशंसा**

ह :—...निशाण **सार्थच**[१] नांव !

(**आ, दा, पं** :—**सार्थच**.—'सार्थच' वर टीपेचा निदर्शक आंकडा हमध्यें आढळतो, तो मुद्रित प्रतींमधून नाहीं. येथें कवितेखालीं दिलेली तळटीप अशी आहे :– 'निशाण म्हणजेच चिह्न' ही तळटीप **सुविचारसमागम** (पु. २, अं. १२) व **करमणूक** (व. ९, अं. १२) मध्यें दिलेली आहे. मुद्रित प्रतींतून ही टीप नाहीं.)

## अनुपलब्ध कविता

म. संशोधनमंडळाकडील हस्तलिखितांत सुटीं पृष्ठें आहेत. त्यांवर मूळचे पृष्ठक्रमांक नाहींत. त्यामुळें आज हस्तलिखित स्वरूपांत ज्या १०२ कविता उपलब्ध झाल्या आहेत, तेवढ्याच मूळच्या वहींत होत्या कीं आणखीहि कांहीं कविता होत्या, हें ठरविण्यास मार्ग नाहीं. पुढें जें परिशिष्ट दिलें आहे, त्यावरून असें दिसेल कीं, कै. ह. ना. आपट्यांना हेंच हस्तलिखित उपलब्ध झालेलें होतें. त्यांच्या आवृत्तींत एकूण १२४ कविता आहेत. म्हणजे त्यांना आधुनिक आवृत्त्यांपेक्षां आठच कविता कमी उपलब्ध झालेल्या होत्या. आज हस्तलिखितांत उपलब्ध न झाल्यानें ज्या कवितांचा विचार प्रस्तुत लेखांत करतां आलेला नाहीं, अशा कविता खालील होत :—

(१) एक खेडें

(२) मित्राची खोली लागलेली पाहून

(३) मदन आणि मदनिका
(४) अहा पक्षी हे चित्र पक्ष यांचे !
(५) काल आणि प्रियेचें सौंदर्य
(६) पुष्पप्रत (' फुला, सुरम्य त्या उषेचिया ' हा प्रारंभ असणारी )
(७) निजलेल्या मुलीस पाहून सुचलेले विचार
(८) कर्तव्य आणि प्रीति
(९) प्रीतीची भाषा
(१०) स्वप्रीतीस अपात्र हा जन—
(११) सुभाषित
(१२) कल्पकता
(१३) आहे जीवित काय?
(१४) खाणावळींतील घृतधारा
(१५) चिन्हीकरण
(१६) दोन बाजी
(१७) सृष्टि आणि कवि
(१८) दिवस आणि रात्र
(१९) गुलाबाची कळी
(२०) कांट्यावांचुनि गुलाब नाहीं !
(२१) नैऋत्येकडील वारा
(२२) दंवाचे थेंब
(२३) मनोहारिणी
(२४) प्रणयकथन
(२५) वातचक्र
(२६) फुलपाखरूं
(२७) दिवाळी
(२८) फिर्याद
(२९) कचाप्रत देवयानी
(३०) गोफण केली छान

## हस्तलिखितांतील हस्तदोषादि त्रुटि

हस्तलिखितांतील लेखन प्रायः साक्षेपानें केलेलें असलें तरी काहीं हस्तदोष आढळणें अपरिहार्य आहे. उदा....

( १ ) **ओतीतसे** हेचि बोल! ( भृंग ) :—मणिबंधवृत्तानुसार 'ती' ह्रस्व पाहिजे.

( २ ) त्याला **सज्य** करावयास न कधीं कोदंड तो लागला ( किरातार्जुनीय-सर्ग १ ला ) :—**आ** मध्यें 'सज्य' असाच पाठ आहे. **दा** आणि **पं** प्रतींतून तो 'सज्ज' असा सुधारलेला आहे.

( ३ ) वदूनि हें, घेउनि **पारितोषिक** ( किरातार्जुनीय-सर्ग १ ला )—मुद्रित प्रतींत 'पारितोषक' असें शुद्ध रूप आहे. पण पारितोषिक' असा शब्दहि रूढ आहेच.

( ४ ) शूरांनो! तर त्वरा **कारा** रे ( तुतारी ).

( ५ ) **महत्व** भारी आहे या पृथ्वीचें, ( विद्यार्थ्यांप्रत ).

( ६ ) **तीचा** आभारी दुवा देत तीतें ( दूर कोठें एकला० )—दिंडीच्या सरणीनुसार 'तिचा' असें लेखन पाहिजे.

( ७ ) वचन दिलें, 'तुमच्याशीं सुनेचिया जुळिन साच नात्यातें'? ( राजा शांतनु )—येथें चरणान्तीं प्रश्नचिह्न आहे, त्याऐवजीं मुद्रित प्रतीप्रमाणें पूर्णविराम पाहिजे.

## लेखनाच्या लकबी

हसणे, धावणे यांचीं क्रियापद-रूपें आणि आम्ही, तुम्ही यांचीं सर्वनाम-रूपें व एकदा, कितिदा हे निपात यांवर अनुस्वार देण्याची प्रथा त्या काळीं रूढ असावी; पण हस्तलिखितांत हे अनुस्वार आढळत नाहींत. ही कवीची खास लकब म्हणावी लागेल. उदा. :—**धावूनी** येउनि तुला धरिती उरीं गा ( आई! आई! ), अलींचे थवे त्यांवरी **धाव** घेती ( कविता आणि प्रीति ), आकांक्षा हृदयांतल्या निकट या आतां पहा **धावती** ( सुन्दरी-दर्शन ), 'गुंगत **धाव** मनीं घेसी ( भृंग ), अशी ही वेडावुनि **हासे** ( म्हातारी ), अनुसरत असे मी **हासुनी** पद्मिनींस ( उगवत असलेल्या सूर्यास ), ते **आम्हीच** शरण्य ( आम्ही कोण? ), तो भोग आहे **अम्हाला** ( एका

भारतीयाचे उद्गार), **तुम्हापासुनी** तो पराभव मनीं शंकी (किराता०), जिंकायास **तुम्हास** तो खल (किराता०), श्रम जिथें **अम्ही** वारिले (सिंहावलोकन), **तुम्हा** त्याची कशाला भिती ? (दिव्य ठिणगी), अंधार–जो फलक होत असे **अम्हास** (गोष्टी घरा०–), लोचनांतुनी तोय **कितिकदा** (सतारीचे बोल), होती श्रेष्ठ पदास आर्यजननी जी पावली **एकदा** (रा. रा. बळवंत—).

कधीं कधीं याला अपवादभूत लेखनहि आढळतें. उदा० :—**तुम्हीं** लविविल्या फांद्यांचीं मी फुलें गडे असतीं खुडलीं (मुळामुठेच्या—).

## इंग्रजी कविता

'समग्र केशवसुत'च्या परिशिष्टांत इंग्रजी कविता दिलेल्याच आहेत. (पृ. ३८५–३८९) त्यांपैकीं 'An Apology to a Flower' या कवितेचें पहिलें उभें अर्धुक उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसतें कीं, या कवितेच्या आठ चरणांपैकीं ३।४ या चरणांचे पाठ हमध्यें वेगळे असावेत. ते चरण 'समग्र केशवसुत' मध्यें पुढीलप्रमाणें आहेत :—

I am enslaved by love so much
That I all claims of self resign.

ह मध्यें या ओळींच्या प्रारंभींचे शब्द अनुक्रमें 'I am a love' आणि 'I sight my' असे आहेत.

## निष्कर्ष

येथवरच्या तौलनिक अभ्यासांत यच्चयावत् प्रामादिक पाठ नोंदले गेलेले आहेत असें नाहीं. अनुस्वार, विरामचिन्हें इ. साध्या गोष्टींबाबत जरी दक्षता बाळगली नाहीं, तरी कवीवर कसा अन्याय होतो, तें दर्शविण्यापुरता आणि केशवसुतांचें हस्तलिखित किती कांटेकोरपणें लिहिलें गेलेलें आहे, हें सिद्ध करण्यापुरताच हा प्रपंच आहे. म. सं. मंडळांतील या हस्तलिखिताशीं कै. ह. ना. आपट्यांची आवृत्ति अधिकांश जुळते, दामलेसंपादित पांचवी आवृत्ति आणि पंडितसंपादित 'समग्र केशवसुत' या आवृत्त्या अनेक ठिकाणीं त्याच्यापासून दूर गेलेल्या आहेत. कदाचित् या संपादकांसमोर केशवसुतांच्या

कवितेचें वेगळें हस्तलिखितहि असूं शकेल. संशोधित पाठशुद्ध आवृत्त्या फक्त प्राचीन कवींच्या बाबतींतच संभवतात, ही समजूत कशी बरोबर नाहीं आणि केशवसुतां-सारख्या आधुनिक कवीच्या संग्रहाचीसुद्धां संशोधित पाठशुद्ध आवृत्ति काढणें, कसें अगत्याचें आहे, हें जरी पटलें, तरी वरील विवेचनाचें चीज झालें असें म्हणतां येईल.

[ खुलासा :—

पृ० १ ओ. ११ :—'कागदाला कागद डकविण्याचें कार्य...' इत्यादि मजकुरांतील अंदाज बरोबर नसावा. परिशिष्ट पहा.

पृ० १४, ओ. १८ :—' वटवट करून...कमी होत होती ' हें वाक्य रद्द समजावें.

पृ० १६, ओ. १२ :—' कीती रुचिर ' ऐवजीं ' किती रुचिर '.

पृ० १६, ओ. २२ :—' करुनि भलतें —' ऐवजीं ' करूनि भलतें—'. ]

# परिशिष्ट

[ महाराष्ट्र सरकारनें कै. केशवसुतांच्या जन्मशताब्दीची जी योजना सिद्ध केली आहे, तींत मराठी संशोधन मंडळांतील प्रस्तुत हस्तलिखिताची यथामूल आवृत्ति काढण्याचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. या हस्तलिखिताचा गतेतिहास निवेदन करणारें एक खाजगी पत्र कै. केशवसुत यांचे पुतणे ( सुप्रसिद्ध व्याकरणकार मोरो केशव दामले यांचे चिरंजीव श्री. द. मो. दामले यांच्याकडून प्रस्तुत लेखकास आलें आहे. त्यांतील संबंधित भाग येथें उद्धृत करण्यांत येत आहे.—**स. गं.** ]

...आतां हस्तलिखिताबद्दलची माझी माहिती देतों. मूळ हस्तलिखित फुलस्केप कागदाच्या ½ ( मोठ्या कागदाच्या; म्हणजे आपल्या नेहमींच्या एक्झरसाइजचे कागद ) आकाराच्या वह्या होत्या. एकूण तीन वह्या होत्या. व ह्यांना ब्राऊन पेपरचा पुठ्ठा ( कव्हर ), बाहेरून, होता. त्यांची मधोमध घडी घालून त्या फितीनें बांधलेल्या होत्या. त्या मुळांत केशवसुतांच्या निधनानंतर माझे वडील व्याकरणकार मोरोपंत यांच्याकडे प्रथम उज्जयिनीला व नंतर नागपूरला गेल्या असाव्यात. मोरोपंतांचे निधनानंतर १९१३ च्या मे जूनमध्यें त्या सीतारामपंत यांचेकडे आल्या हें मात्र नक्की. त्यांचा पत्ता श्री दिवाकर (नाट्यछटाकार) यांस लागला, त्यांचेमार्फत हा पत्ता कै. हरीभाऊ आपटे यांस लागला, नंतर हरीभाऊंनीं श्री. दिवाकरांमार्फत त्या सीतारामपंतांकडून मागून नेल्या. त्यांचा समग्र काव्यसंग्रह प्रकाशित करण्याबद्दलची जाहीरात "करमणूक" मध्यें नोव्हेंबर १९१३ त प्रसिद्ध झाली. ती आवृत्ति सतरांत प्रसिद्ध झाल्यावर वह्या परत सीतारामपंत यांचेकडे आल्या. त्यांनीं १९२१ मध्यें व १९२७ मध्यें ( ऑक्टोबर ) दोन आवृत्ति काढल्या...१९३०–३२ पर्यंत फितीनें बांधलेल्या तीन वह्या मी स्वतः पाहिलेल्या होत्या. १९३२ ते ३५ पर्यंत केव्हांतरी कै. प. चिं. दामले यांनीं ४ थी आवृत्ति प्रकाशित केली. त्यावेळीं मूळ हस्तलिखितावरून काव्य तपासून, शुद्ध स्वरूपांत तें छापावें अशी प. चिं. दामले यांनीं इच्छा प्रदर्शित केली. तें काम त्यानीं श्री. हरी सखाराम गोखले ( "कांहीं तरी" काव्यसंग्रहाचे कर्ते ), कवि, यांचेकडे सोंपवलें होतें. वह्या जीर्ण झाल्या आहेत, कागद फाटून, तुकडा पडेल असा झाला आहे, तेव्हां ते कागद ( वह्या सोडून ) सुटे करावेत आणि त्यांस दोन्ही बाजूस पारदर्शक कागद चिकटवावा, अशी योजना छापखानदार श्री. शंकरराव ( मामासाहेब ) दाते [ हे त्यावेळीं लोकसंग्रह छापखाना, अनाथ विद्यार्थी गृह, याचे व्यवस्थापक होते; त्या छापखान्यांत ती आवृत्ति छापली गेली... ] यांनीं योजून त्याप्रमाणें त्या काव्यांचे वह्यांवर हा नवा संस्कार झाला. त्या वेळीं कै. प्रा. रा. कृ. लागू हे एक अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिणार होते. पण प. चिं. दामले व ते यांचें वेळापत्रक जमेना; व ती प्रस्तावना तशीच राहिली. छपाईचें काम

झाल्यावर माझ्या अनुमतीनें हस्तलिखित प्रा. लागूंकडे राहिलें. तें जवळ जवळ १९५०–५२ पर्यंत, म्हणजे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाकडे जाईपर्यंत, त्यांचेकडे सुरक्षित राहिलें. पुढें त्यांच्यांत व माझ्यांत त्याचे संबंधांत विचार झाला. मी प्रथम पुणे विद्यापीठ किंवा त्याचेहि आधीं भारत इतिहास संशोधन मंडळ, अशा संस्थांकडे तें द्यावें अशा मताचा होतों. पुढें पुणे विद्यापीठ मला जास्त पसंत होतें. पण प्रा. लागूंचा त्या वेळीं त्या संस्थेबद्दल तितका चांगला ग्रह नव्हता. त्यांनीं मला सभ्यांची संस्था व प्रा. अ. का. प्रियोळकर यांचें नांव सुचविलें; आणि त्याप्रमाणें ही व्यवस्था झाली. मी स्वतः तें हस्तलिखित १९३२ ते ३५ पर्यंत पाहिलेलें होतें, तेव्हां त्या वह्याच होत्या. त्या स्वरूपांतच मी प्रा. लागूंकडे तें नेऊन दिलें होतें. अलीकडे १९६५ च्या फेब्रुवारींत प्रा. प्रियोळकर यांस भेटून त्यांचे टेबलावरच मी तें त्यांचे नजरेसमोर पाहिलें. प्रथम ( कागद सुटे केले आहेत, याचें विस्मरण झालेलें असल्यामुळें ) मला तें त्या स्वरूपांत पाहून धक्काच बसला. पण पुढें त्या वर्षीच जूनमध्यें श्री. मामासाहेब दाते यांस त्या हस्तलिखिताची माहिती विचारली, त्यांसहि कांहीं आठवत नव्हतें, कांहीं सांगतां आलें नाहीं. पण मलाच पुढें त्यांचेकडून कळलेली माहिती – मूळ कागदांना मागेंपुढें पारदर्शक कागद जोडणें हा संस्कार—आठवला !... हें हस्तलिखित जर माझेच जवळ प्रा. लागूंकडून परत आलें असतें तर...पानशेत पूरप्रकरणांत ज्याप्रमाणें "शास्त्रीय मराठी व्याकरण" या ग्रंथाच्या हस्तलिखिताचा नाश झाला, त्याप्रमाणें याचाहि झाला असता ! पण आज हें आपणा सर्वांचें सुदैव !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ......... दि: .........
क्रमांक ......... नोंद दि: .........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५२९८
स्थळ प्रत

REFBK-0015214

प्रकाशक : **अ. का. प्रियोळकर**, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई–१४

मुद्रणस्थळ : **पुरुषोत्तम अच्युत गुर्जर**, मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१ सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई–४